बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

'महायुती सरकारचा हा ३६०० कोटींचा घोटाळा'

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मालवणमध्ये राजकोट किल्ल्याच्या परिसरात उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५ फुटांचा भव्य पूर्णाकृती पुतळा कोसळला आहे. त्यामुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. या घटनेनंतर विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला जातोय. काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी राज्य सरकारवर ३६०० कोटींच्या घोटाळ्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यांच्या या आरोपांमुळे एकच खळबळ उडाली आहे. प्रणिती शिंदे यांच्या या आरोपांवर आता भाजपकडून काय प्रतिक्रिया देण्यात येते ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

बीड | बुधवार,दि.२८ऑगस्ट २०२४ | वर्षे४रे | अंक२७वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

अनेक लाडक्या बहिणी पैशांच्या प्रतिक्षेत!

योजना: अदिती तटकरेंनी दिली महत्त्वाची माहिती

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र सरकारने राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. या योजनेद्वारे महिलांच्या खात्यात दर महिना १५०० रुपये देण्यात येणार आहेत. या योजनेला सर्वसामान्य महिलांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. या योजनेसाठी जुलै महिन्यात अर्ज केलेल्या महिल्यांच्या खात्यात पैसे जमा झाले आहेत. त्यानंतर आता असंख्य महिला ऑगस्टमध्ये अर्ज करणाऱ्या महिलांच्या खात्यात कधी पैसे येणार, अशी विचारणा करत आहे. आता राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी याबद्दल महत्त्वाची माहिती दिली आहे.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जुलै महिन्यापासून सुरु झाली. सुरुवातीला या योजनेचे अर्ज भरताना महिलांना असंख्य अडचणींचा सामना करावा लागला. मात्र त्यानंतर सरकारने यात अनेक बदल करत ही प्रक्रिया सोपी-सुटसुटीत बनवली. यानंतर असंख्य महिलांनी जुलै महिन्यात हा अर्ज दाखल केला. या सर्व महिलांना जुलै आणि ऑगस्ट अशा दोन महिन्याचे ३ हजार रुपये रक्षाबंधनापूर्वी मिळाले. यानंतर आता ऑगस्ट महिन्यात अर्ज सादर करणाऱ्या महिलांच्या अर्जांची पडताळणी सुरु करण्यात आली. आता अखेर ऑगस्ट महिन्यात अर्ज केलेल्या महिलांच्या खात्यात पैसे कधी येणार? याची माहिती समोर आली आहे.

अदिती तटकरेंनी दिली महत्त्वाची माहिती

राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, लाडकी बहीण योजनेचा दुसरा राज्यस्तरीय मेळावा नागपूरमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. हा मेळावा येत्या ३१ ऑगस्टला होणार आहे. या माध्यमातून ऑगस्ट महिन्यात अर्ज दाखल केलेल्या महिलांच्या खात्यात जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे तीन हजार रुपये पाठवण्यात येणार आहेत, अशी माहिती अदिती तटकरे यांनी दिली. ज्या महिलांनी ऑगस्ट महिन्यात अर्ज सादर केले आहेत. त्यांच्या अर्जांची छाननी सुरु आहे. त्यांना ३१ ऑगस्टला पैसे मिळतील, असं अदिती तटकरे म्हणाल्या.

जुलै महिन्यात १ कोटी ८ लाख महिला लाभार्थी

राज्य सरकारकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या प्रचारासाठी विविध जिल्ह्यात कार्यक्रमांचं आयोजन केलं जात आहे. यातील पहिला राज्यस्तरीय निधी वितरण सोहळा पुण्यात पार पडला होता. त्यानंतर आता दुसरा सोहळा नागपूरमध्ये आयोजित केला जात आहे. ऑगस्ट महिन्यात साधारण ५० लाखांहून अधिक अर्ज आले आहेत. या अर्ज सादर करणाऱ्या महिला अर्जदारांपैकी पात्र ठरलेल्या महिलांच्या खात्यात ३ हजार रुपये दिले जाणार आहे. यापूर्वी जुलै महिन्यात अर्ज सादर करणाऱ्या महिला अर्जदारांपैकी पात्र ठरलेल्या १ कोटी आठ लाख लाभार्थी महिलांच्या खात्यात तीन हजार रुपये वर्ग करण्यात आले होते.

वरठाणमध्ये बिबट्याचा चार वासरांवर हल्ला!

भयभित: तीन ठार तर एक गंभीर जखमी

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

दावणीला असलेल्या वासरांवर बिबट्याने हल्ला करून तीन वासरु ठार केले तर एकास गंभीर जखमी केल्याची घटना मंगळवार (दि २७)पहाटे चार वाजता वरठाण शिवारात घडली. गट न.१७७ मध्ये प्रेमसिंग शिंदे यांनी दुग्ध व्यवसायसाठी काही गायी पालन केलेल्या आहेत त्याच शेतात एका गोठ्यात चार गायी व सहा वासरु,दोन बैल दावणीला होते पहाटे चार वाजता बिबट्याने अचानकपणे हल्ला करून तीन वासरु ठार केले असुन एक वासरुला गंभीर जखमी केले आहे मंगळवारी सकाळी सात वाजता शेतकरी दुध काढण्यासाठी शेतात गेले असता ही घटना निदर्शनास आली या घटनेबाबत वनविभागास माहीती देण्यात आली असुन घटनास्थळी वनविभागाच्या कर्मचारी जावून पंचनामा केला आहे दरम्यान ह्या घटनेत पाशुपालक

मांजरसुंभा बसस्थानकात ठिय्या आंदोलन!

आक्रमक: विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, आर्थिक नुकसान

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मागील तीन दिवसापासून मांजरसुंबा बस स्थानकातून एसटी बस येत नसल्यामुळे मांजरसुबा येथील शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शाळा कॉलेजात उपस्थित राहता आले नाही. विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक आणि आर्थिक ही नुकसान होत आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंदांना सोबत घेऊन मांजरसुंबा बस स्थानकात ठिय्या आंदोलन केले. विद्यार्थ्यांनी मांजरसुंबा बस स्थानकात ठिय्या आंदोलन करताच एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी ताबडतोब एसटी बस उपलब्ध करून दिली. त्यानंतर विद्यार्थी आपापल्या घरी सुरक्षितरीत्या पोहोचले. यापुढे विद्यार्थ्यांना शाळा महाविद्यालयात येण्यासाठी एसटी बस उपलब्ध न झाल्यास शिक्षक मुख्याध्यापक यांच्यासह विद्यार्थी विद्यार्थिनी रास्ता रोको आंदोलन करणार असल्याचा इशारा बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाचे जिल्हा सचिव तथा शिक्षक सेना बीड जिल्हाध्यक्ष प्राचार्य विष्णुपंत रसाळ पाटील यांनी एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

बीड एसटी महामंडळाच्या गलथान कारभारामुळे व हलगर्जीपणामुळे मांजरसुंबा बस स्थानकामध्ये मागील तीन दिवसापासून एसटी बस येत नसल्यामुळे शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शाळा महाविद्यालयात उपस्थित राहता आले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होत आहे. मांजरसुंबा येथील डॉक्टर पारनेरकर महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मध्ये १४० मुली व ९० मुले नियमित पासधारक आहेत. ते धनगरवाडी, पान २ वर...

पंढरपूर: चंद्रभागा धोक्याच्या पातळीकडे

अस्मानी : पूरसदृश स्थिती कायम

पंढरपूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

भीमा आणि नीरा खोऱ्यात पावसाचा जोर कायम आहे. वीर धरणातून मंगळवारी दुपारी चार वाजता पाण्याचा विसर्ग कमी केला, तर दुसरीकडे उजनी धरणातून चंद्रभागा नदीत पाण्याच्या विसर्गात थोडी वाढ केली आहे. हे पाणी चंद्रभागा नदीला येऊन मिळते. त्यामुळे चंद्रभागा नदी धोक्याच्या पातळीकडे पोहचली आहे. पूरसदृश स्थिती कायम आहे. शहरातील नदीकाठच्या झोपडपट्टीतील कुटुंबांना स्थलांतरित केले आहे. नदीकाठच्या रहिवाशांनी दक्ष राहावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.सोलापूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी वरुणराजाने हजेरी लावली आहे. त्यामुळे ओढे, नाले भरून वाहत आहेत. तसेच पुण्यात पावसाचा जोर कमी-जास्त होत आहे. दौंड येथून ६७ हजार क्युसेक पाणी उजनी धरणात येत आहे, तर दुसरीकडे वीर धरणातून नीरा नदीत ५५ हजार क्युसेक पाणी सोडले आहे. हे पाणी नीरा नृसिंहपूर येथे नीरा आणि भीमा नदीचा संगम होतो तेथे येते. संगमातून पुढे पाणी भीमा अर्थात चंद्रभागा नदीत जाऊन मिसळते. संगम या ठिकाणी १ लाख ३१ हजार क्युसेक वेगाने पाणी वाहत आहे, तर उजनी धरण आणि संगम येथून आलेल्या पाण्याने चंद्रभागा नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. मंगळवारी दुपारी ४ वाजता चंद्रभागा नदीतून १ लाख ३० हजार क्युसेक पान २ वर...

केजमध्ये सर्वच प्रमुख कार्यालयात प्रभारीराज

बोंबला: तहसिलदार, मुख्याधिकारी, बिडीओ सर्वच प्रभारी !

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्याच्या प्रशासनात एकही पदाचा अधिकारी नसल्याने तालुक्यात प्रभारीराज सुरू आहे. तहसीलदार आणि नगरपंचायत मुख्याधिकारी या दोन्ही पदाचा पदभार अंबाजोगाईस्थित एकाच नायब तहसीलदारांकडे सोपविण्यात आला आहे. पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी पदाचा अतिरिक्त पदभार देखील अंबाजोगाईच्याच गटविकास अधिकाऱ्यांकडे देण्यात आला आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यात पदाचे अधिकारी नियुक्त करण्याची मागणी होऊ लागली आहे.केज येथील तत्कालीन तहसीलदार अभिजित जगताप यांच्यावर लाचप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांच्याकडील पदभार काही काळ नायब तहसीलदार लक्ष्मण धस यांच्याकडे तर अत्यल्पकाळ धारूरच्या तहसीलदारांकडे देण्यात आला. नगरपंचायतीचे तत्कालीन मुख्याधिकारी महेश गायकवाड यांनी धारूरला बदली करून गेल्यानंतर नागरपंचायतीचा अतिरिक्त पदभार काही दिवस अंबाजोगाईच्या मुख्याधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला. मात्र दोन्ही अतिरिक्त पदभार दिलेले अधिकारी हे तहसील व नगरपंचायतीत मिळून येत नसल्याची व कामे रखडून पडल्याची ओरड होऊ लागली. हीच संधी साधून लोकप्रतिनिधींनी आपल्या मर्जीतील अधिकाऱ्यास या दोन्ही पदावर बसविण्यासाठी आटापिटा करीत नायब तहसीलदार सचिन देशपांडे यांच्याकडे तहसीलदार व मुख्याधिकारी या दोन्ही पदाचा पदभार सोपविला. देशपांडे हे स्थानिकचे असून मागील २५ वर्षांपासून त्यांनी अत्यल्प काळ आंबाजोगाईचा अपवाद सोडला तर दीर्घकाळ केज येथेच सेवा दिली आहे. शासनाच्या सेवाशर्तीनुसार एखाद्या अधिकाऱ्याचे त्याच्या कार्यक्षेत्रात फारसे हितसंबंध नसावेत. मात्र देशपांडे स्थानीकचे असल्याने त्यांचे सर्व पक्षातील पदाधिकाऱ्यांसोबत हितसंबंध निर्माण झाल्याची सतत पान २ वर...

दोन शिक्षकांना राष्ट्रीय पुरस्कार

गडचिरोली, कोल्हापूरच्या शिक्षकांचा सन्मान

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

अध्यापनात अभिनव पद्धतींचा वापर करत, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणाऱ्या दोन शिक्षकांचा राष्ट्रीय पुरस्काराने सन्मान करण्यात आला आहे. यंदा गडचिरोली जिल्ह्यातील मंताय्या बेडके, कोल्हापूर येथील सागर बगाडे राष्ट्रीय पुरस्काराचे मानकरी ठरले आहे.केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२४ मध्ये पुरस्कारप्राप्त ठरलेल्या शिक्षकांची यादी प्रसिद्ध केली. त्यानुसार देशभरातील ५० शिक्षक पुरस्कारप्राप्त ठरले आहेत. त्यात राज्यातील दोन शिक्षकांचा समावेश आहे. शिक्षक दिनी (५ सप्टेंबर) दिल्लीतील विज्ञान भवन येथे होणाऱ्या कार्यक्रमात शिक्षकांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.मंताय्या पान २ वर...

जय शाह ICC च्या अध्यक्षपदी बिनविरोध

क्रीडा: जागतिक क्रिकेटमध्ये आता भारताचा दबदबा

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (इउउख) सचिव जय शाह यांच्याबाबत एक मोठी बातमी आली आहे. जय शाह आता आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (खउउ) नवे अध्यक्ष होणार आहेत. खउउ चेअरमन पदासाठी अर्ज करणारे एकमेव अर्जदार जय शाह होते. यासह जय शाह यांची अध्यक्षपदासाठी बिनविरोध निवड झाली. येत्या १ डिसेंबर २०२४ पासून जय शाह आयसीसीच्या अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारतील. २७ ऑगस्ट ही या पदासाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख होती. ३५ वर्षीय जय शाह हे पद भूषवणारे सर्वात तरुण व्यक्ती ठरले आहेत.आयसीसीचे विद्यमान अध्यक्ष ग्रेग बार्कले पान २ वर...

बेशिस्त वर्तन

प्रश्न विचारले म्हणून बस २० मिनिटे थांबवून ठेवली

महिला बसवाहक आहे की सायको?

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी परळी ते बीड लालपरी प्रवसात करत असताना प्रवाशासोबत घडलेला हा धक्कादायक , प्रकार आहे, पांगरी ता.परळी येथील पर्यायी नळकांडी पुल वाणनदीला आलेल्या पुरानी चार दिवसा पूर्वीच वाहून गेला आहे. महामंडळाने गेल्या चार दिवसापासून या महामार्गावर बस सेवा वळवली आहे,परंतु रोड निश्चित न केल्याने याचा नाहाक त्रास बस प्रवास करणाऱ्या प्रवाशांना होत आहे. परळी ते सोनपेठ, सोनपेठ ते शिरसाळा त्यानंतर बीड थेट बीडचे तिकीट मिळत नाही. तात्काळ रूट निश्चित करून थेट परळी ते बीड जाणाऱ्या प्रवासात तिकीट देण्याची व्यवस्था करावी. यामुळे प्रवास करणाऱ्या ग्राहकांना अतिरिक्त भाड्याचा त्रास करावे लागत आहे. यावर आजच आपण निर्णय घ्यावा अन्यथा आपली व आपल्या उद्धट वाहक व चालक यांची तक्रार आपल्यावरील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे करणार आहे. परळी बस स्थानकाचे डेपो मॅनेजर यांना अनेक वेळा बस मधून फोन केला त्यांनी तो फोन उचलला नाही. परळी ते बीड बस मध्ये प्रवास करत करताना हा सर्व प्रकार घडला . सदरील परळी डेपो ची बसचा क्रमांक चक-२० इड-१८८२

या बसचे चालक व वाहक यांच्यावर कारवाई करण्यात यावी थेट तिकिटाची मागणी केल्यानंतर, व्यवस्थित बोलण्याऐवजी आपण वरिष्ठांशी बोला, व हुज्जत घालत बस मध्येच रस्त्यावर १५ ते २० मिनिटं थांबवली, पाठीमागून येणारी देखील बस अधिकारी आहेत म्हणून थांबून घेतली, त्या बसमधील वाहक व चालक हे आमच्या बसमध्ये येऊन आम्हाला शांत राहण्याची सूचना करत होते. या उलट आपण परळीच्या डेपो मॅनेजर यांना बोला असे सांगण्यात आले व नंबर उपलब्ध करून दिला नाही. चर्चा अंति हा आपला नंबर देण्यात आला. बस मध्ये घडत असलेला पान २ वर...

अधिकाऱ्यांनो दबावतंत्रास बळी पडू नका

अनिल जगताप:ट्रेनी शिक्षकांच्या निवडीसाठी गरजवंतास प्राधान्य

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ग्रामीण भागात प्रती शाळा एक प्रशिक्षणार्थी या प्रमाणे सुयोग्य व पात्र उमेदवारांची कागदपत्रे प्राप्त करून शाळेकरिता एका प्रशिक्षणार्थी ट्रेनी शिक्षकांची निवड करायाची आहे. मात्र संबंधित अधिकारी सरपंच व इतर लोकांच्या दबावाखाली येऊन स्वतःची नातलग संबंधी यांनाच गरज नसताना या योजनेचा फायदा करून देत आहेत. यामुळे तळागाळातील गरजू लोकांची हेळसांड होत असून या योजनेसाठी सर्वोपरी पात्र असलेल्या गोरगरीब कुटुंबातील उमेदवारास लाभ होत नसल्याच्या तक्रारी शिवसेना कार्यलयात आल्या आहेत. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब सर्व सामान्य जनतेच्या हितासाठी योजना राबवत आहेत, त्या आमलात आणत आहेत. मात्र काही अधिकारी दबावतंत्रास बळी पडून गोरगरीब आणि गरजू माणसांच्या तोंडातला घास काढून नाते संबंधातील अपात्र उमेदवारास भरवत आहे. त्या सर्व अधिकाऱ्यांना माझे कळकळीचे आवाहन आहे की, त्यांनी कुणाच्याही दबावाखाली न येता मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ग्रामीण भागात प्रती शाळा एक प्रशिक्षणार्थी या प्रमाणे सुयोग्य व पात्र उमेदवारांची कागदपत्रे प्राप्त करून नियम अटींनुसारच शाळेकरिता एका प्रशिक्षणार्थी ट्रेनी शिक्षकांची निवड करावी. जर आपल्यावर कुणी दबाव टाकत असेल तर याची माहिती आम्हाला द्यावी. मात्र कुणाच्या दबावाखाली पान २ वर...

सुधारणांची निवृत्ती!

गेल्या दहा वर्षांत सरकारी कामगार संघटनांच्या नेत्यांस भेटण्यासाठी पंतप्रधानांस वेळ मिळाला नव्हता. ताज्या निवडणुकीत मतदारांचा दणका बसल्यावर तो मिळाला आणि पाठोपाठ सरकारी कर्मचाऱ्यांच्या रोषाच्या केंद्रस्थानी असलेली नवी निवृत्तिवेतन योजनाही रद्द झाली. हा योगायोग खचितच नाही. ही केंद्राची गेल्या चार महिन्यांतील पाचवी माघार. वक्फ बोर्ड सुधारणा, वैद्याकीय विम्यावरील वस्तू-सेवा कर, प्रसारण विधेयक, सरकारी पदांवर खासगी व्यक्तींच्या नेमणुकीसारखा महत्त्वाचा निर्णय आणि आता हे निवृत्तिवेतन घूमजाव. केंद्र सरकारच्या प्रवक्त्यांनी या संदर्भात कितीही 'हे घूमजाव नाही' असा कंठशोष केला तरी वास्तव लपून राहणारे नाही. यात कृषी सुधारणा, जमीन हस्तांतरण कायदा इत्यादी आधीच्या घूमजाव निर्णयांचा समावेश केल्यास या सरकारचे वर्णन 'घूमजाव-सरकार' असे करता येईल. खरे तर ताजी माघार ज्या प्रकरणी केंद्राने घेतली तो जुनी निवृत्ती योजना रद्द करून त्याजागी कर्मचाऱ्यांचा आर्थिक सहभाग असलेली नवी निवृत्ती योजना आणणे हा अत्यंत स्तुत्य निर्णय होता. तो आता बदलून अर्धी नवी-अर्धी जुनी अशी एक मध्यममार्गी योजना आणण्याची घोषणा नरेंद्र मोदी सरकारने केली. हे; चार पावले मागे जाणे टाळून दोन पावले मागे जाण्यासारखे. पण माघार ती माघार. हे सत्य नाकारता येणारे नाही. तेव्हा नव्या योजनेने काय साधले जाईल यावर भाष्य करण्याआधी जुन्याचे काय झाले याचा आढावा घ्यायला हवा.

नव्या निवृत्तिवेतन योजनेचा मूळ निर्णय अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारचा. त्यास नंतरचे पंतप्रधान मनमोहन सिंग यांचाही पाठिंबा लाभला. तीनुसार १ एप्रिल २००४ पासून सरकारी सेवेत दाखल झालेल्या सर्वांस या नव्या योजनेत सहभागी करून घेतले गेले. या योजनेत कर्मचारी आपल्या सेवाकाळात दरमहा वेतनातील १० टक्के रक्कम निवृत्तिवेतनाच्या तरतुदीसाठी वळती करतो आणि सरकार या निधीसाठी १४ टक्के रक्कम देते. हा निधी निवृत्तिवेतनसंबंधित प्राधिकरणाने घालून दिलेल्या नियमांनुसार विविध ठिकाणी गुंतवला जातो. यातून जी काही पुंजी जमा होते ती सदर कर्मचाऱ्यास निवृत्तीनंतर मासिक वेतनाच्या रूपाने परत केली जाते. याउलट जुन्या निवृत्तिवेतन योजनेत सर्वच्या सर्व खर्च केवळ सरकारनेच करण्याची प्रथा होती. वाजपेयी सरकारच्या या बदलास मनमोहन सिंग यांनी वैधानिक बळकटी दिली आणि २००५ साली मार्च महिन्यात एका विधेयकाद्वारे 'निवृत्तिवेतन निधी' ही संकल्पना कायद्यात अंतर्भूत केली गेली. तथापि यातील पहिली तुकडी जेव्हा निवृत्त झाली तेव्हा हाती पडलेला निधी हा अपेक्षाभंग करणारा असल्याचा ओरडा झाला आणि पाहता पाहता जुन्या निवृत्ती योजनेच्या पुनरुज्जीवनाचे वारे वाहू लागले. त्या वेळी सरकारनेच सादर केलेल्या तपशिलानुसार त्याआधीच्या, म्हणजे २०२२ सालच्या ऑक्टोबरापर्यंत या नव्या योजनेत केंद्र सरकारच्या सेवेतील २३.३० लाख कर्मचारी सहभागी झाले होते. तसेच सर्व राज्य सरकारांतील ५८.९ लाख इतके कर्मचारीही तीत सहभागी होणे अपेक्षित होते. काही राज्यांचे झालेही. अशा तऱ्हेने पाऊण कोटभरांहून अधिक कर्मचारी या नव्या निवृत्ती योजनेचे सदस्य बनले. तथापि 'या योजनेद्वारे मिळणारे निवृत्तिवेतन पुरेसे नाही' अशी हाकाटी हिमाचल प्रदेश विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर काँग्रेसने दिली आणि पाहता पाहता चित्र पालटले. त्या निवडणुकीत पराभव झाल्यावर तर भाजपने हाय खाल्ली आणि माघारीचीच तयारी सुरू केली. आज काँग्रेस, 'आप' आदी पक्षांच्या किमान पाच राज्य सरकारांनी नव्या योजनेस तिलांजली देऊन जुन्याचा आधार घेतलेला आहे. निवडणुकांच्या तोंडावर आता महाराष्ट्रानेही तोच मार्ग अंगीकारला आणि केंद्राप्रमाणेच माघार घेतली. वास्तविक उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या जुन्या निवृत्ती योजनेविरोधात भूमिका घेतली होती. परंतु मनमोहन सिंग, पी चिदम्बरम आदींप्रमाणे फडणवीस यांनाही आपले आर्थिक शहाणपण खुंटीस टांगून ठेवत राजकीय निर्णय घ्यावा लागला.

त्यात आता भरच पडेल. वास्तविक देशातील समस्त कर्मचाऱ्यांच्या तुलनेत सरकारी कर्मचाऱ्यांचे प्रमाण जेमतेम पाच टक्के. पण हा वर्ग संघटित. त्यामुळे सरकारांस हवे तसे वाकवण्याची त्यांची क्षमता निर्विवाद. तीच लक्षात घेऊन राजकीय पक्ष या संघटितांचे लांगूलचालन करतात. एकाने केले म्हणून दुसऱ्यासही ते करावे लागते. वास्तविक वेतन/निवृत्तिवेतनावर इतका खर्च होणार असेल तर त्याची किंमत पुढील पिढ्यांस द्यावी लागणार आहे, हा विचारच आपल्याकडे नाही. म्हणजे या वाढत्या खर्चाने उत्तरोत्तर सरकारी कर्मचारी भरती कमी होत जाईल अणि मोठ्या प्रमाणावर हंगामी/ कंत्राटी पद्धतीने कामे करून घेतली जातील. म्हणजेच रोजगार संधी आटतील. पण 'आफ्टर मी द डेल्यूज', म्हणजे आपल्यापश्चात जगबुडी झाली तरी बेहत्तर असा स्वार्थी विचार यामागे असल्याने पुढच्या पिढीसमोरील आव्हान अधिक गडद होईल.

पुन्हा एकदा आपलं सरकार आणायचं

आ.पंकजाताई मुंडे: मतदार संघात संवाद दौरा

लातूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी आज निलंगा, तुळजापूर आणि अक्कलकोट मतदारसंघांत कार्यकर्ता संवाद दौरा करून मतदारसंघांचा आढावा घेतला. वलांडी येथे आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या जनसन्मान पदयात्रेतही त्यांनी सहभाग घेतला. येणाऱ्या निवडणुकीत जोमाने कामाला लागण्याचे आवाहन त्यांनी पदाधिकाऱ्यांना केले.

आ. पंकजाताई मुंडे यांनी सकाळी आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी सुरु केलेल्या जनसन्मान पदयात्रेत वलांडी ता. देवणी येथे सहभागी होऊन उपस्थित असंख्य जनसमुदायाशी संवाद साधला. यावेळी बोलतांना पंकजाताई म्हणाल्या, लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांनी आयुष्यात जमा केलेली सर्व सामान्य माणसाच्या प्रेमाची शिदोरी जपायची असेल तर मन मोठं ठेवावं लागेल. मुंडे साहेब गेल्यावर मी कधीच रडणार नाही अशी शपथ घेतली

होती. पण ज्यावेळेस लोकसभा निवडणुकीत माझा पराभव झाला आणि तो जिव्हारी लागून माझ्या जिवाभावाच्या कार्यकर्त्यांनी आत्महत्या केल्या त्यांना बघून मला अश्रू अनावर झाले. कारण तुमच्यासाठीच आमच्या मनामध्ये अश्रू आणि स्वप्न आहेत. संभाजीराव तुम्ही पदयात्रेची चांगली संकल्पना राबवली, तुम्हाला जनतेचे आशीर्वाद नक्की मिळतील. या भागातील देवणी गावाला तालुक्याचा दर्जा देण्याचे काम लोकनेते मुंडे साहेबांनी केल्यामुळे येथील लोकांचं साहेबांवर विशेष प्रेम आहे, या निःस्वार्थ प्रेमाची प्रचिती त्यांनी केलेल्या उत्स्फूर्त स्वागतातून आली.

पुन्हा एकदा आपलं सरकार आणायचं आहे

पदाधिकाऱ्यांशी बोलताना पंकजाताई म्हणाल्या, आरक्षण भारतीय जनता पार्टीचा मुख्यमंत्री असताना दिल गेलं हे ठणकावून सांगण्याची गरज आहे.आपल्याला पुन्हा एकदा आपलं सरकार आणायचं आहे, परत एकदा येथील आमदार आपल्याला निवडून आणायचा आहे. पक्षाने दिलेल्या सूचना, कार्यक्रमांची काटेकोर अंमलबजावणी करा.पक्ष आपल्या कामाचं कौतुक करतो, आपल्या भावना ऐकून घेतो त्यामुळे जोमाने कामाला लागा.

संत सेना महाराजांच्या पुण्यतिथी कार्यक्रम

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी



संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त शुक्रवार दि.३० रोजी जव्हेरी गल्ली, कबाड गल्ली विठ्ठल मंदिर संत सेना महाराज समाज भवन येथे सकाळी ठीक ९.०० वाजता महापूजा, दुपारी १२.०० वाजता महाआरती व आरतीनंतर लगेचच महाप्रसादाला सुरुवात होईल तरी सर्व समाज बांधवांनी पुण्यतिथी सोहळ्यास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक सुनील आण्णा काळे, दिपक भाऊ दोडके, मुकुंद दोडके, किरण काळे, अशोक दोडके, अक्षय काळे, गजानन दोडके, मयूर भालेकर, श्रीकांत साळुंखे, महेश दोडके, जगदीश वखरे, किरण वाघमारे, मंगेश मोरे, आनंद दोडके, गणेश काळे, अक्षय दोडके, अनिल सरडे व संत सेना महाराज पुण्यतिथी उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

पान सहा वरून

मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षण...यासाठी शनिवार, रविवार हे शासकीय सुट्ट्यांचे दिवस अर्ज स्वीकारण्यासाठी निवडण्यात आले. तालुक्यातील इच्छुक प्रशिक्षणार्थ्यांची यामुळेच मोठी गफलत होऊन त्यांची सोमवारी नेवासा पंचायत समितीत गर्दी झाली. मात्र संबंधितांनी त्यांना मुदत संपल्याचे कारण देऊन सदरच्या ८८ जागाच्या नियुक्त्याही करण्यात आल्याचे सांगण्यात आले. प्रशिक्षणार्थी भरतीमध्ये अनागोंदी झाल्याचे लक्षात आल्याने काही संतप्त वंचित उमेदवारांनी आम आदमी पार्टीचे ऍड. सादिक शिलेदार तसेच वंचित बहुजन आघाडीच्या पोपट सरोदे यांना माहिती देऊन लक्ष घालण्याची विनंती केली. ऍड.शिलेदार आणि सरोदे येणार असल्याचे समजताच नेवासा पंचायत समितीच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी पळ काढला. ऍड. शिलेदार आणि सरोदे यांनी आक्रमक भूमिका घेतल्यानंतर तालुका शिक्षण अधिकाऱ्यांच्या सुचनेवरून उपस्थित कर्मचाऱ्यांनी इच्छुक प्रशिक्षणार्थ्यांचे अर्ज स्वीकारण्यास पाच वाजल्यानंतर सुरुवात केली. यासाठी अर्ज करण्यासाठी सुचविण्यात आलेले शासकीय संकेतस्थळ चालूच नसल्याचा आरोप इच्छुक उमेदवारांनी यावेळी केला.

गणेशोत्सव शांतता व

पाडावा यासाठी बीडमधील नगर रोडवरील एक बाजू येत्या आठ दिवसात सुरू केली जाईल. व दुसऱ्या बाजुचे खड्डे बुजविले जातील आणि पुढील काम उत्सवानंतर केले जाईल असे त्यांनी सांगितले.मिरवणूक मार्गावर असणाऱ्या विजेच्या तारांपासून सुरक्षा असावी या दृष्टीकोणातून कामे करावीत असे निर्देश त्यांनी वीज मंडळास यावेळी दिले. मंडळांनी शांततेत उत्सव पार पडावा यासाठी सहकार्य करावे, असे ते म्हणाले.

रिक्षावाला पण निघाला

दिसले या रिक्षाचालकाने कोणाचे सामान पडले का याची चौकशी केली मात्र लागला नाही त्यामुळे त्याने ईमानदारी दाखवून पोलीस स्टेशन परळी शहर येथे ड्युटीवर असलेले पोलीस हवालदार मुजमुले पोलीस अमलदार मोहन दुर्गे यांच्याकडे आणून दिले. दरम्यान शहर पोलिसांनी या भाविकांचा शोध घेऊन व शहानिशा करून त्यांचे किमती सामान व मोबाईल त्यांना परत केले. मंदिर व परिसरात असलेली गर्दी व घाईगडबडीच्या व सार्वजनिक ठिकाणी गाळ झालेल्या रस्त्यावर पडलेल्या किमती वस्तू अतिशय सकारात्मकता दाखवून इमानदारीने पोलिसांपर्यंत व भाविकांना ते परत करण्यापर्यंत भूमिका घेणाऱ्या या रिक्षाचालकाचे शहर पोलीस ठाण्याचे पो.नी लोहकरे यांनी अभिनंदन केले आहे.

रॅगिंगमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य

टोमणे मारले जातात. त्यांनी मनासारखे तसे न केल्यास त्यांना हाण-मार केली जाते. यामुळे कांही विद्यार्थी अशा गोष्टी सहन न करू शकल्याने जीवन संपवतात. वास्तविक पाहता या बाबी कायद्याने चुकीच्या असल्याने अशा गोष्टी करणाऱ्या विद्यार्थ्यांना कायद्याने दोन वर्षांचा कारावास व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा आहे. इतकेच नाही तर असा गुन्हा करणाऱ्या विद्यार्थ्यांस किमान पाच वर्षे किंवा कायमची शिक्षण बंदीची शिक्षा दिली जाऊ शकते. म्हणून विद्यार्थी व पालकांनीही आपली मुले अशा गुन्हेगारीच्या जाळ्यात अडकणार नाहीत याची काळजी घ्यावी असे आवाहनही हनुमंत भोसले यानी केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य एम जी फावडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जेष्ठ विधिज्ञ एस व्ही मिसळे यांनी केले. यावेळी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

बीडमध्ये जनसन्मान

येत आहे. जनसन्मान यात्रेच्यानिमित्ताने पक्षाचे गुलाबी झेंडे, कमानी उभारल्या जात असून शहराचे वातावरण 'गुलाबीमय' होणार आहे. दरम्यान, जनसन्मान यात्रेत बीड विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली आहे.

पान एक वरून

वरठाणमध्ये बिबट्याचा चार

शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.या शिबारात गेल्या पंधरा दिवसांपासून बिबट्यांचा मुक्त संचार .सुरू आहे शिवारातील जमीन डोगरालगत असुन भक्ष्याच्या शोधात बिबट्या शेती शिवारात येत असतो गेल्या पंधरा दिवसांपासून ह्या शिवारात काही ठीकाणी शेतकऱ्यांना बिबट्याचे दर्शन झाल्याचे शेतकरीने सांगितले बिबट्याचा मुक्त संचार वाढल्याने पशुपालकासह शेतकऱ्यांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे.

मांजरसुंभा बसस्थानकात

कपिलधारवाडी, कोळवाडी, गवारी व उदंड वडगाव या ठिकाणाहून शाळेला एसटी बसने ये जा करत आहेत. परंतु मागील तीन दिवसापासून एसटी बस न आल्यामुळे त्यांना शाळेत येण्या-जाण्यास अडचणीचा सामना करावा लागत आहे. तसेच त्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे आज मंगळवार दिनांक २७ रोजी विद्यार्थी विद्यार्थिनीनी शिक्षक व कर्मचा-यांनी एसटी बससाठी मांजरसुंबा बस स्थानकात ठिय्या आंदोलन केले. विद्यार्थ्यांनी ठिय्या आंदोलन केल्यानंतर परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी बस उपलब्ध करून दिली. त्या नंतर विद्यार्थी सुरक्षितरित्या आपापल्या गावी घरी परत गेले.एसटी महामंडळ राजकीय पक्षांच्या सभा व मेळाव्यासाठी बीड येथून एसटी बस बाहेरगावी पाठवत आहेत. त्यामुळे विद्यार्थी व नागरिकांची प्रचंड हेळसांड होत आहे. ही अत्यंत दुर्दैवी व खेदाची बाब आहे. यानंतर एसटी बस वेळेवर व नियमित न आल्यास मांजरसुंबा चौकात विद्यार्थी,पालक, शिक्षक कर्मचारी व मुख्याध्यापकांच्या मार्फत रास्ता रोको करण्यात येईल आणि एसटी महामंडळाच्या सर्व आगाराच्या बस अडवण्यात येतील असा इशारा बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाचे जिल्हा सचिव तथा शिक्षक सेना बीड जिल्हाध्यक्ष प्राचार्य विष्णुपंत रसाळ पाटील यांनी आगार प्रमुख एसटी आगार बीड व विभाग नियंत्रक रा. प . म . बीड यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार, परिवहन मंत्री, शिक्षण मंत्री दीपक केसरकर महाराष्ट्र यांना पाठवण्यात आल्या.

पंढरपुर : चंद्रभागा धोक्याच्या

पाणी वाहत आहे. सोमवारी सोडलेले पाणी मंगळवारी नदीला आले आहे. त्यामुळे सर्व घाटांच्या पायऱ्यांवर पाणी आले आहे.शहरातील नदीकाठच्या झोपडपट्टीतील रहिवाशांचे स्थलांतर करण्यात आले आहे. तसेच जर पाण्याची पातळी रात्रीतून वाढली, तर इतर ठिकाणच्या नागरिकांना स्थलांतरित करण्यासाठी पालिकेने नियोजन केले आहे. शहरात आणि विशेष करून नदीकाठच्या भागात पालिकेने दक्ष राहण्याचे आवाहन केल्याची माहिती पालिकेचे उपमुख्याधिकारी ड. सुनील वाळुजकर यांनी दिली आहे.दरम्यान, या आधीदेखील पूरसदृश स्थिती निर्माण झाली होती. मात्र, त्या वेळेस पाटबंधारे विभागाने योग्य नियोजन केल्याने पुराचे संकट टळले होते. सध्यादेखील पुण्यातून उजनीत येणारा विसर्ग बघून नियोजन केले जात आहे. असे असले, तरी नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

केजमध्ये सर्वच प्रमुख

ओरड होत असते. ते अधिनस्थ कर्मचाऱ्यांवर अंकुश ठेवत नसल्याने प्रशासकीय व्यवस्थाच कोलमडून गेली आहे. प्रशासनाचा कारभार खाजगी कंपन्याभिमुख सुरू आहे. विडा परिसरात पवनचक्की उभारणी करणाऱ्या आवादा नामक कंपनीने तेथील शेतकऱ्यांच्या परस्पर त्यांच्या पिकांची नासधूस करीत भर पिकातून रस्ते तयार केले. कंपनीच्या दंडेलशाहीची तक्रार तहसीलदारांकडे केल्यानंतर देखील त्यांनी किमान स्थळ पाहणी करण्याची सुद्धा तसदी घेतली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोश असून त्यांच्यामधून संताप व्यक्त केला जात आहे. तेथील शेतकऱ्यांचा प्रशासनाच्या विरोधात उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिवाय शेतकऱ्यांच्या शेतरस्त्यासह इतर प्रश्नी वेळीच निर्णय घेतला जात नसून वेळ मारून नेण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर चकरा मारण्याची वेळ येत आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने या ठिकाणी पदाच्या तहसीलदारांची नियुक्ती कधी होणार ? असा सवाल उपस्थित केला जात आहे.नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी पदाचा पदभार देखील देशपांडे यांच्याकडेच असला तरी तहसीलदारांची खुर्ची सोडून मुख्याधिकाऱ्याच्या खुर्चीवर जाऊन बसण्यासाठी त्यांना वेळ मिळत नाही. त्यामुळे नगरपंचायतीचे कामकाज तहसील कार्यालयातून सुरू आहे. कर्मचारी तहसीलकडे चकरा मारत असून अडचणी घेऊन गेलेल्या नागरिकांना मुख्याधिकाऱ्यांच्या रिकाम्या खुर्चीकडे पाहून हात हलवत परतावे लागते. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने शहरात रोगराई आणि स्वच्छतेचे प्रश्न चव्हाट्यावर येत आहेत. नागरिकांना डेंग्यु, चिकन गुनिया, मलेरिया या सारख्या आजारांना बळी पडावे लागत आहे. स्वच्छतेचे प्रश्न सुटत नसल्याने नागरिकांवर नगरपंचायतीच्या नावाने फलक लावून जाहीर निषेध करण्याची वेळ येत आहे. त्यामुळे लोकांच्या गरजा ओळखून काम करणाऱ्या पदाच्या मुख्याधिकाऱ्यांची नगरपंचायतीला गरज आहे.

पंचायत समितीचे तत्कालीन गटविकास अधिकारी राजेंद्र मोराळे यांची वाशी येथे बदली झाल्यानंतर जागा रिक्त आहे. त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर जणू पदाचा अधिकारी येऊ द्यायचाच नाही असेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी ठरवले आहे की काय अशी शंका घ्यायला जागा आहे. गुत्तेदार कार्यकर्ते पोसण्यासाठी मर्जीतील अधिकाऱ्यांकडे पदभार देण्याचा आटापिटा सुरू आहे. अंबाजोगाईच्या गटविकास अधिकारी समृद्धी दिवाने यांच्याकडे अतिरिक्त पदभार दिल्याने त्या आठवड्यातील एक दिवस केजला देतात. त्यामुळे इतर दिवशी गटविकास अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यासाठी कर्मचारी, ग्रामसेवक, सरपंच अंबाजोगाईला चकरा मारत आहेत. तक्रार घेऊन आलेल्या नागरिकांना गटविकास अधिकारी हजर नसल्याने तक्रार कोणाकडे करायची असा प्रश्न पडत आहे. त्यांच्या अनुपस्थितीमुळे इतर विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर त्यांचा अंकुश नसल्याने ते देखील वेळेवर उपस्थित राहत नसून कार्यालयात अनेकांच्या खुर्च्या रिकाम्या दिसतात. समाज कल्याणच्या विहिरीसाठी जमा केलेल्या प्रस्तावास मंजुरी कधी मिळणार, एमआरईजीएसच्या विहिरी, गायगोठ्याचे कुशलचे बिल कधी निघणार अशी विचारणा करण्यासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांची अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे ससेहोलपट सुरू आहे.दरम्यान, या प्रमुख कार्यालयाचा पदभार मर्जीतील अधिकाऱ्यांकडे सोपविल्याने ते सर्वसामान्य नागरिक, शेतकऱ्यांना दाद द्यायला तयार नाहीत. त्यांच्या कार्यक्षेत्रात दलाल निर्माण झाल्याने एक प्रकारची समांतर प्रशासकीय व्यवस्था निर्माण झाल्याचे चित्र आहे. तालुक्यात प्रमुख आणि मोक्याच्या ठिकाणी पदाचे अधिकारी नियुक्त करावेत अशी मागणी नागरिक आणि शेतकऱ्यांतून होत आहे.

दोन शिक्षकांना राष्ट्रीय

बेडके गडचिरोली जिल्ह्यातील जाजावंडी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत कार्यरत आहेत. 'गेली १४ वर्षे संवेदनशील, दुर्गम भागात कार्यरत आहे. या काळात शाळेची पटसंख्या आठवरून १३८ पर्यंत वाढवण्यात यश मिळाले आहे. ग्रामीण दुर्गम भागात शाळा असूनही लोकसहभागाच्या माध्यमातून शाळेत इनव्हर्टर, स्मार्ट टीव्ही अशा सुविधा विकसित केल्या आहेत. उपक्रमांच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर देत आहे. राष्ट्रीय पुरस्काराच्या रुपाने माझ्या कामाची दखल शासकीय पातळीवर घेतली गेल्याचा आनंद आहे,' अशी भावना त्यांनी व्यक्त केली.तर सागर बगाडे कोल्हापूर येथील एस. एम. लोहिया हायस्कूलमध्ये गेली तीस वर्षे ते चित्रकला शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. निवृत्तीच्या उंबरठ्यावर असताना त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. 'विद्यार्थ्यांना घेऊन देशविदेशात कार्यक्रम केले आहेत. दोन विश्वविक्रम नोंदवले गेले आहेत. सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात योगदान दिले आहे. दुर्गम भागातील मुले, शरीरविक्रय करणाऱ्या महिलांची मुले यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले. या पुरस्काराने जबाबदारी वाढल्याची भावना आहे. हा पुरस्कार मुलांना अर्पण करत आहे. कारण मुलांमुळेच मला शिकायला मिळाले. निवृत्त होत असताना पुरस्कार मिळाल्याने शेवट गोड झाल्यासारखे वाटते आहे,' असे बगाडे यांनी सांगितले.

जय शहा आयसीसी

यांचा कार्यकाळ ३० नोव्हेंबर रोजी संपणार आहे. त्यांनी सलग दुसऱ्यांदा हे पद भूषवले आहे. पण अलीकडेच त्याने तिसऱ्या टर्मच्या शर्यतीत नसल्याचे सांगितले आहे. अशा स्थितीत, खेळाची जागतिक प्रशासकीय संस्था असलेल्या आयसीसीमध्ये जय शाह अध्यक्षपदासाठी दावा खूप मजबूत मानला जात होता. जय शाह यांनी बीसीसीआयचे सचिव म्हणून भारतीय क्रिकेटला वेगळ्या पातळीवर नेऊन ठेवले. आता त्यांची आयसीसी अध्यक्षपदी निवड झाल्याचा फायदा भारतीय क्रिकेटलाही नक्कीच होईल, असे सुनील गावसकर यांनीही त्यांच्या क्रीडा स्तंभलेखात म्हटले होते.खउउ नुसार, जय शाह हे एकमेव उमेदवार होते ज्यांनी या पदासाठी अर्ज दाखल केला होता आणि पुढील अध्यक्ष म्हणून त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. शाह हे आयसीसी बोर्डातील सर्वात प्रभावशाली चेहऱ्यांपैकी एक मानले जातात. ते सध्या आयसीसीच्या शक्तिशाली वित्त आणि व्यावसायिक व्यवहार उप-समितीचे प्रमुख आहेत. खउउ अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर जय शाह यांनी क्रिकेटचा जागतिक स्तरावर पोहोच आणि लोकप्रियता आणखी वाढवण्याचा मानस व्यक्त केला. आयसीसीच्या निवेदनानुसार शाह म्हणाले की, आयसीसी अध्यक्षपदी निवड झाल्यामुळे मी भारावून गेलो आहे. जागतिक क्रिकेटला पुढे नेण्यासाठी मी आयसीसी संघ आणि आमच्या सदस्य राष्ट्रांसोबत काम करण्यास वचनबद्ध आहे. आम्ही एका महत्त्वपूर्ण टप्प्यावर उभे आहोत जिथे अनेक स्वरूपांच्या सह-अस्तित्वाचा समतोल राखणे, नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आणि नवीन जागतिक बाजारपेठांमध्ये आमच्या प्रमुख कार्यक्रमांची ओळख करून देणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. क्रिकेटला आणखी लोकप्रिय बनवण्याचा आमचा उद्देश आहे.जय शाह म्हणाले, जगभर क्रिकेटला अधिक पसंती मिळावी यासाठी अधिक विचार करण्याची गरज आहे. लॉस एंजेलिस ऑलिम्पिक २०२८ मध्ये क्रिकेटचा समावेश केल्याने क्रिकेट वाढत असल्याचे दिसून येते. मला विश्वास आहे की हा खेळ अभूतपूर्व मार्गांनी पुढे जाईल

महिला बसवाहक

प्रकार मी पत्रकार असल्याने सर्व मोबाईल मध्ये रेकॉर्ड करत होतो, वाहक महिला (कंडक्टरणे) पत्रकाराच्या हातातील व्हिडिओ रेकॉर्डिंग करत असलेला मोबाईल झडप मारून हिसकाटून घेतला, तो बराच वेळ दिला नाही. या वाहक महिलेने उडवा उडवी उत्तरे दिली. सर्व बसमधील प्रवासाला वेटीस धरले. एका पत्रकाराला व्हिडिओ करण्यापासून व वार्तांकन करण्यापासून रोखले,अशा हे बेशिस्त व उद्धटपन्नाची वागणूक देणाऱ्या वाहक व चालकावर योग्य ती कारवाई करा. अन्यथा आपल्या कार्यालया समोर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

अधिकाऱ्यांनो दबावतंत्र

येऊन अपात्र उमेदवाराची निवड करू नये. अन्यथा शिवसैनिकांशी गाठ असेल आणि त्यांना शिवसेना स्टाईलनेच उत्तर देण्यात येईल असे शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी माध्यमांना पत्रक जारी करत अधिकाऱ्यांना सूचना आवाहन करून कडक इशारा दिला आहे. हेळसांड कदापी सहन करणार नाही : मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ग्रामीण भागात प्रती शाळा एक प्रशिक्षणार्थी या प्रमाणे सुयोग्य व पात्र उमेदवारांची कागदपत्रे प्राप्त करून शाळेकरिता एका प्रशिक्षणार्थी ट्रेनी शिक्षकांची निवड करायाची आहे. मात्र संबंधित अधिकारी सरपंच व इतर लोकांच्या दबावाखाली येऊन स्वतः ची नातलग संबंधी यांनाच गरज नसताना या योजनेचा फायदा करून देत आहेत. यामुळे तळागाळातील गरजू लोकांची हेळसांड होत असून या योजनेसाठी सर्वोपरी पात्र असलेल्या गोरगरीब कुटुंबातील उमेदवारास लाभ होत नसल्याच्या तक्रारी शिवसेना कार्यलयात आल्या आहेत. अधिकाऱ्यांनी कुणाच्याच दबावाखाली न येता नियम अटीनुसारच काम करावे आणि मुख्यमंत्री योजनेचा लाभ गोरगरीब गरजवंत पात्र उमेदवारास द्यावा. गरजवंत आणि पात्र उमेदवाराची हेळसांड कदापि सहन करणार नाही असे शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी माध्यमांना जारी केलेल्या पत्रकात म्हंटले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

शाईनिंग मारण्यासाठी कर्णकर्कश आवाज!

मागणी | बुलेटमधून आवाज काढणाऱ्या छपरींना चोप द्या

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

मागील काही वर्षांपासून शान की सवारी म्हणून शाईनिंग मारण्यासाठी बुलेटच्या मूळ सायलेन्सरमध्ये बदल करून कर्णकर्कश फटाक्यांसारखा आवाज करीत बाईक रस्त्यावर सुसाट धावत आहेत. मात्र या मुजोर दुचाकी चालकांवर कुणाचेही नियंत्रण राहिले नसल्याने शहरात व्यापारी, व्यावसायिकांसह नागरिक मोठ्या आवाजामुळे त्रस्त झाले आहेत.

शहरांप्रमाणेच ग्रामीण भागात देखील शान की सवारी म्हणून परिचित असलेल्या बुलेट या दुचाकीची क्रेज पुन्हा एकदा तरुणाईमध्ये वाढली आहे. मात्र काही बुलेट शौकिन स्वत:कडे इतरांचे लक्ष वेधून आपला शोक पूर्ण करण्यासाठी दुचाकीच्या मूळ सायलेन्सरमध्ये बदल करून कर्णकर्कश आवाजाचे सायलेन्सर बसवत असल्याचे नवे फॅड गावागावात पोहोचले आहे. अशा कर्णकर्कश आवाजामुळे आष्टीसह कडा परिसरात शालेय मुले, पादचारी आणि इतर वाहनचालकांना उपद्रव होऊ लागला असून, शहरातील व्यापारी, व्यावसायिक त्रस्त झाले आहेत, रस्त्यावर सुसाट धावणा-या दुचाकींमुळे लहानमोठे अपघात सतत घडत आहेत. त्यामुळे इतरांना नाहक त्रासदायक ठरणा-या दुचाकींच्या कर्णकर्कश आवाजाची पोलिस प्रशासनाने गंभीर दखल घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

मागील काही दिवसापासून बुलेटस्वारांचे फटाके सायलेन्सर बसविण्याचे प्रमाण वाढले असून, या प्रकारावर पायबंद घालण्यासाठी पोलिसांनी कठोर पावले उचलण्याची गरज आहे. बुलेट कंपनीकडून 'ऑन रोड' येणाऱ्या वाहनांचे मुळ सायलेन्सर सर्व चाचण्या पुर्ण करूनच तयार केलेले असतात. मात्र तरुणाई आपला शौक पूर्ण करण्यासाठी मूळ सायलेन्सर मध्ये बदल करून कर्णकर्कश आवाजाचे सायलेन्सर बसवण्याचे नवे फॅड इतरांसाठी डोकेदुखी बनले आहे.

बुलेटच्या सायलेन्सरमध्ये बदल करून कणकर्कश आवाजाचे प्रमाण वाढले आहे. चालकांना ठोठावण्यात येणारी दंडाची एक हजार रुपयांची रक्कम किरकोळ वाटते. त्यामुळे यापुढे सायलेन्सरमध्ये बदल करणाऱ्या बुलेटचालकांवर जरब बसण्यासाठी सुसाट वाहन चालविण्याचे कलम लावण्याची मागणी नागरीकांतून होत आहे.

आपेगावी रंगला माऊलींचा जन्मोत्सव!

अध्यात्मिक:जन्मोत्सवानिमित्त मंदिरात फुलांची आरास

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि भगवान श्रीकृष्ण परमात्माचा जन्मोत्सव एकाच दिवशी साजरा केला जातो. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी संत सम्राट ज्ञानोबारायांचा ७४९ वा जन्मोत्सव जन्मभूमी असलेल्या श्रीक्षेत्र आपेगाव येथे साजरा करण्यात आला.याही वर्षी संत सम्राट ज्ञानेश्वर माऊलींच्या मूर्तीला फुलांची आकर्षक आणि मनमोहक आरास करण्यात आली होती. .

काल अष्टमीच्या दिवशी रात्री १० ते १२ यावेळात श्री ह.भ.प. भानुदास महाराज कोल्हापूरकर (भाऊ)यांचे पुष्पवृष्टी कीर्तन झाले. त्यानंतर रात्री १२वा.माऊलींच्या मूर्तीचा महाअभिषेक करून जन्मोत्सव मोठा भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.यावेळी फटाक्यांची जोरदार आतषबाजी करण्यात आली होती.हा जन्मोत्सव सोहळा याची देही याची डोळा पाहण्यासाठी आपेगावी भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. जन्मोत्सवानिमित्त मंदिरात सात दिवस विविध धार्मिक कार्यक्रम पहाटे कलशपूजन,४ ते ६ काकडा भजन, सकाळी ६ ते ७ विष्णूसहस्त्रनाम, सकाळी ७ ते१० ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी १० ते ११ बाळक्रीडा गाथाभजन,सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ८ ते १० हरीकिर्तन व जागर अशा धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या सप्ताहाची सांगता ३०ऑगस्टला काल्याच्या कीर्तनाने होणार आहे.

पुणे शहरात झिकीचा प्रवेश

उद्योग:विविध सेवांसाठी विश्वासार्ह साथीदार

पुणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

देशातील आघाडीचा उद्योगसमूह असलेल्या द चॅटर्जी ग्रुपने (टीसीजी) सेवा क्षेत्रात ऑनलाइन सुविधा पुरवण्यासाठी फर्स्ट लिव्हिंग स्पेसच्या (एफएलएस) माध्यमातून दैनंदिन गरजेच्या उपयुक्त सेवा देण्यासाठी 'झिकी'ॲप दाखल केले आहे. या ॲपद्वारे पुण्यात प्रायोगिक तत्वावर सेवा देण्यात येत असून, त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. 'झिकी' ॲपचा उद्देश स्पष्ट करताना, एफएलएसचे एमडी आणि सीईओ सौविक बॅनर्जी म्हणाले, 'झिकी' हे केवळ एक ॲप्लिकेशन नाही; हा एक वैयक्तिक सहकारी आहे. प्रत्येकाला दररोजच्या आयुष्यात आवश्यक असणाऱ्या विविध सेवा प्रदान करण्यासह, तज्ज्ञांच्या साह्याने आर्थिक मार्गदर्शन देण्याचाही आमचा प्रयत्न आहे. एक सुयोग्य आणि परिपूर्ण जीवनशैली शोधणाऱ्यांसाठी एक अपरिहार्य साधन बनण्याची झिकीची आकांक्षा आहे. आम्ही प्रायोगिक तत्वावर चाचणी करण्यासाठी पुण्याची निवड केली आहे.'झिकी'ने येथील महत्त्वाच्या परिसरातील मोठमोठ्या सोसायट्यांमध्ये लोकांना आवश्यक असणाऱ्या विविध सेवा देण्यास सुरुवात केली आहे. यामध्ये घरकामासाठी मदतनीस, घरातील लहान मुले, वयोवृद्ध व्यक्ती यांच्याकजे लक्ष देण्यासाठी मदतनीस, पार्टी किंवा गेटटुगेदरसाठी भोजनासह सर्व व्यवस्था पुरवणे अशा अनेक सेवांचा समावेश आहे. झिकी ॲपवर एका क्लिकवर विविध सेवा निवडता येतील. ही फक्त सुरुवात आहे. लवकरच 'झिकी'चा इतर शहरांमध्ये विस्तार करणे आणि देशातील जास्तीतजास्त लोकांपर्यंत त्याचे फायदे पोहोचवणे हे आमचे उद्दिष्ट आहे, असेही बॅनर्जी यांनी सांगितले. फर्स्ट लिव्हिंगस्पेसेसबद्दल: फर्स्ट लिव्हिंगस्पेसेची स्थापना २०२३-२४ मध्ये करण्यात आली. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि इतर अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सामर्थ्याचा उपयोग करून व्यक्ती आणि समुदायांचे जीवन सुकर करण्यासाठी कंपनी समर्पित आहे. टीसीजीबद्दल: न्यूयॉर्कमध्ये मुख्यालय असलेले,टीसीजी पेट्रोकेमिकल्स, आयटी, रिअल इस्टेट आणि आर्थिक सल्लागारांसह विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत आहे. समूहाच्या विविध उपक्रमांमध्ये हल्दिया पेट्रोकेमिकल्स (एचपीएल), एमसीपीआय, ल्युमस टेक्नॉलॉजी, लॅबव्हान्टेज, टीसीजी रिअल इस्टेट, टीसीजी डिजिटल आणि गार्डन वरेली आदींचा समावेश आहे.

नाथसागर धरण पाण्याची आवक

दिलासा: धरण परिक्षेत्रात जोरदार पाऊस

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठवाड्याच्या शेती सिंचनासाठी वरदान असलेल्या पैठण येथील नाथसागर धरणामध्ये मोठ्या प्रमाणावर वरील छोट्या मोठ्या बंधारे व धरणातून पाण्याची आवक येत असल्याने मंगळवारी दि.२७ रोजी सकाळी दहा वाजेच्या दरम्यान येथील नाथ सागर धरण ५५.२० टक्के च्या पुढे भरले आहे.

गेले चार दिवसापासून नाथसागर धरणाच्या वरील भागातील नाशिक परिसरातून मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक येथील नाथसागर धरणामध्ये जमा होत असून मंगळवारी रोजी सकाळी दहा वाजता धरण नियंत्रण कक्षात नोंद केल्यानुसार पाण्याची आवक ९७ हजार ७७७ क्युसेक सुरू असून. चार टक्के पाणीसाठा शिल्लक असलेल्या नाथसागर धरणात सध्या एकूण पाणीसाठा १९३६.४७२ दलघमी असल्याने धरणाची टक्केवारी ५०.४८ झाले असून. पाण्याची आवक अशाच पद्धतीने सुरू राहिल्यास पाण्याची टक्केवारी मोठी वाढ होणार असल्याची माहिती धरण उप अभियंता विजय काकडे यांनी दिली आहे. धरणाची पाणी पातळी झपाट्याने वाढ होत असल्याने छत्रपती संभाजीनगर, जालना, जिल्ह्यातील औद्योगिक वसाहत, शेतकऱ्यासह नागरिकांचा पाणी प्रश्न मिटला आहे.

बीड: महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाच्या अध्यक्षपदी समीर काझी यांची निवड झाल्याबद्दल शुभेच्छा देताना जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष इकबाल कुरेशी, ए.एम खुद्दुस, शेख रियाझ,शेख जुबेर,शेख मेराज आदी.

लिटल फ्लावर किड्स स्कूलमध्ये गोपाळकाला

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई शहरातील लिटल फ्लावर किड्स स्कूल मध्ये गोपाळकाला निमित्ताने शाळेच्या बाल गोपिकांनी दहिहंडी फोडत गोविंदा रे गोपाला च्या गजरात एकच जल्लोष केला. विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक कसरत करीत आनंदाने सामूहिक कार्य एकतेने करण्याची संघ भावना वाढीस लागण्याच्या उद्देशाने दहिहंडी लिटल फ्लावर किड्स स्कूल मध्ये साजरी केली. दहिहंडी फोडण्यापूर्वी 'गोविंदा आला रे आला' च्या गाण्यावर ठेका धरत विद्यार्थी विद्यार्थिनींनी नाचत एकच जल्लोष केला. गोपाळकाला साजरा करतांना दहिहंडी फोडण्यासाठी एकावर एक थर लावण्याचा प्रयत्न बाल गोपिका करत असतांना विद्यार्थी पाण्याचा मारा करीत. उंचावर टांगलेली दहिहंडी बाल गोपिकांनी थर लावून हातात काठी घेऊन फोडली आणि गो गो गोगोविंदा च्या गाण्यावर एकच जल्लोष केला. दहिहंडी उत्सवात शिक्षकांनीही विद्यार्थि व बाल गोपिकांसह नाचत आंनद व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे चेअरमन

प्रा. गणेश गिरे, श्रीमती गीतांजली राख मॅडम, श्रीमती ललिता मेहता मॅडम, श्रीमती कचरे मॅडम यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. दरम्यान यावेळी आपल्या चिमुकल्यांचे कलागुण पाहण्यासाठी व प्रोत्साहन देण्यासाठी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोयगाव तालुक्यात गोविंदाचा थरार

दहीहंडी:घोसला गावात गोविंदाने पटकाविला मान

घोसला/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यात दही हंडीचा उत्साह मंगळवारी (ता.२७) रात्री उशिरापर्यंत शिगेला पोहचला होता दरम्यान गोविंदानी दही हंडीचे थरावर थर रचत उत्साह वाढविला दरम्यान रात्री साडे सात वाजता सोयगाव तालुक्यातील घोसला गावात पहिली दही हंडी फोडण्यात आली घोसला गावातील अमोल गोपाळ या गोविंदा ने पाच थरावरील दही हंडी फोडली होती दरम्यान जरंडी, घोसला, तिडका बनोटी,गोंदेगाव यासह १५ गावात दही हंडीचा उत्साह शिगेला पोहचला होता जरंडीच्या राजेछत्रपती शिव प्रतिष्ठानच्या वतीने रात्री उशिरा सात थरांची दही हंडी फोडण्यात आली होती अध्यक्ष गुरुदास पाटील यांच्या राजे शिव छत्रपती मंडळाचे हे सहावे वर्षे आहे दरम्यान ढोल ताशांच्या

गजरात सोयगाव तालुक्यात दही हंडीचा जल्लोष रात्री पर्यंत सुरू होता जरंडी आणि घोसला गावात गोविंदांनी मान पटकाविला होता घोसला येथे राहुल उगले, समाधान शिंदे, आबा उगले ,राहुल गोपाळ, गणेश माळी,भावेश गवळी, भैया गोपाळ, वाल्मिकी गवळी, कांतीलाल ऊगले आदींनी पुढाकार घेतला.

डॉ.गणेश ढवळे | मान्सुनपुर्व कोट्यवधींचा खर्च

साठवण तलावाच्या भिंतीवर झाडेझुडपे!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३ अंतर्गत साठवण तलावाच्या भिंतीवर मोठमोठाली झाडे, झुडपे असुन यामुळे तलावाच्या भिंतीला धोका निर्माण होण्याची शक्यता असुन त्यांची मान्सुनपुर्व साफसफाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी ६ महिन्यांपूर्वी जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदनाद्वारे केल्यानंतर शिवकुमार स्वामी अपर जिल्हा दंडाधिकारी बीड यांनी तहसीलदार बीड आणि कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३ बीड यांना निवेदनातील नमुद मुद्यांबाबत आपल्या स्तरावरून तात्काळ चौकशी करून नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी असे लेखी आदेश दिलेले आहेत मात्र यापत्राला संबंधितांनी केराची टोपली दाखवल्याचे निदर्शनास आले आहे त्यामुळे संबंधित प्रकरणात जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय व दंडात्मक कारवाई

करून साठवण तलावाच्या भिंतीवरील झाडाझुडुपांची साफसफाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

पाणी अडवा पाणी जिरवा यासह शेतकऱ्यांना उन्हाळ्यात,हिवाळी हंगामात पिकांना पाणी मिळावे, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटावा यासाठी बीड जिल्ह्यात माजलगाव, बिंदुसरा,कुंडलिका यासह अनेक छोटे मोठे साठवण तलावांची निर्मिती करण्यात आली आहे.या तलावाच्या देखभाल दुरुस्तीसाठी पाटबंधारे विभाग दरवर्षी कोट्यवधींचा खर्च करते.मान्सुनपुर्व दुरूस्तीच्या नावाखाली लाखोंची बिले फाडली जात असताना तलावांच्या भिंतीवरील झाडे,झुडपे याकडे मात्र साफ दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे मान्सुनपुर्व दुरूस्तीचा कोट्यवधींचा खर्च पाटबंधारे विभाग नेमकं कोणाच्या घशात घालते हा खरा प्रश्न आहे. संबंधित प्रकरणात सखोल चौकशी होऊन कारवाई करण्यात यावी.

पाटबंधारे संयुक्त पथकाचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष

जिल्हा प्रशासन पाणी टंचाईचे आराखडे आखताना पाटबंधारे प्रकल्पाच्या ठिकाणी विद्युत मोटारी अथवा अन्य साधनांद्वारे करण्यात येणारा अवैध पाणी रोखण्यासाठी संबंधित पाटबंधारे विभागाचे अधिकारी, कर्मचारी, तहसिल तसेच गटविकास अधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी व महावितरणचे कर्मचारी यांची संयुक्त पथके पाहणी करून जिल्हा प्रशासनाला अहवाल सादर करतात तेव्हा तलावाच्या भिंतीवरील झाडा झूडपांकडे जाणिवपूर्वक डोळेझाक करताना दिसुन येतात. त्यांनी जिल्हा प्रशासनाला तसा अहवाल पाठवला तर दरवर्षी नियमित साफसफाई होईल मात्र याकडे तहसिल प्रशासन गांभीर्याने पाहताना दिसुन येत नाही.

गोविंद नामाच्या गजरात दिंडी

परंपरा: के.रामलु शाळेत कृष्ण जन्माष्टमी

कुंडलवाडी/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील के.रामलू पब्लिक स्कूल या शाळेत गोविंद नामाच्या गजरात दिंडी काढून पालकासह उत्साहात कृष्ण जन्माष्टमी साजरी करण्यात आली .यात सुरुवातीला शाळेतून विद्यार्थ्यांनी विविध देवी देवतांच्या वेशभूषेसह वारकरी व डोक्यावर तुळशीवृंदावन घेऊन मुली श्रीकृष्ण नामाचा गजर करत लेझीम, दांडियासह पालखी गावात फिरवून शाळेत आणण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून कुंडलवाडी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक नारायण शिंदे व पत्रकार तथा लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय धर्माबाद येथील प्राध्यापक डॉ. माधव हळदेकर यांच्या उपस्थितीत श्रीकृष्णाच्या पाळण्याचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी स्वागत गीता सह श्रीकृष्णाची गाणी गरबा,दांडिया इत्यादी नृत्यासह आपली कला सादर केली. शाळेत नव्यानेच सुरू करण्यात आलेल्या फाउंडेशन वर्गाचे प्रथम घटक चाचणी व प्रत्येक रविवारी घेण्यात येणारी चाचणी या दोन्ही परीक्षेतील प्रत्येक वर्गातील दहा गुणवंत विद्यार्थ्यांचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मेडल्स व शैक्षणिक साहित्य देऊन सत्कार करण्यात आले. वर्ग दहावीच्या विद्यार्थीनींनी गोविंदा आला

रे आला या गीतावर नृत्य करत दहीहंडी फोडली व उपस्थित सर्वांना काल्याचा प्रसाद वाटण्यात आला.यात पालकांनी सुद्धा मनसोक्तपणे आपले पाल्य व शिक्षकांसोबत गरबा, दांडियासह, वारकरी नृत्याचा आस्वाद घेतला .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश कागळे तर आभार प्रदर्शन संतोष भाले यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. याबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष साईरेड्डी ठक्कूरवार संचालिका रमा ठक्कूरवार सचिव यशवंत संगमवार,प्राचार्य संजू शेळके, पर्यवेक्षक राजेश कागळे यांनी अभिनंदन व कौतुक केले.

सुविचार :सकारात्मक विचारांनी जीवनातील अडचणी सोप्या होतात.

महायुती समोरील आव्हाने....!

राज्यातील राजकीय परिस्थिती दिवसागणिक बदलत असल्याचे दिसते. राज्याची विधानसभा निवडणूक काही काळासाठी पुढे ढकलण्यात सत्ताधारी यशस्वी झाले असले तरी हा वाढीव कालावधी महायुतीसाठी तारकच ठरेल याची शाश्वती नाही. त्यातच महायुतीचे काही बडे नेते राजकीय सोईसाठी आघाडीकडे आणि त्यातही शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडे धाव घेत असल्याचे दिसते. महायुतीच्या जागा वाटपात त्या त्या पक्षाच्या विद्यमान आमदारांना पुन्हा संधी मिळणार हे जवळपास स्पष्ट आहे, काही अपवादात्मक जागांवर बदल होऊ शकतो, परंतु त्यांची संख्या खूप कमी असेल. त्यामुळेच गेल्या पाच वर्षांपासून किंवा त्याही आधीपासून ही विधानसभा निवडणूक लढविण्याची तयारी करणाऱ्या नेत्यांना ऐनवेळी धक्का बसण्याची शक्यता वाटत असल्याने त्यांनी आतापासूनच आपली वेगळी वाट निवडण्याचे ठरविलेले दिसते. कोल्हापूरचे समरजित घाटगे असो अथवा इंदापूरचे हर्षवर्धन पाटील असो, हे दोन्ही नेते दीर्घकाळापासून भाजपात आहेत, परंतु यावेळी त्यांना भाजपकडून संधी मिळण्याची शक्यता दिसत नाही. कागलमध्ये राष्ट्रवादीचे विद्यमान आमदार हसन मुश्रीफ पुन्हा रिंगणात उतरणार असल्याने त्यांच्या विरोधात लढण्यासाठी गेल्या पाच वर्षांपासून तयारी करीत असलेले समरजित घाटगे आता शरद पवारांच्या पक्षाकडून लढण्यासाठी राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहे. तेच इंदापूरच्या बाबतीतही घडण्याची शक्यता आहे. अजित पवारांचे विश्वासू दत्ता भरणे इंदापूरमधून पुन्हा लढणार हे निश्चित असल्याने हर्षवर्धन पाटलांनीही शरद पवारांशी संधान साधल्याची बातमी आहे. अन्य काही मतदारसंघातही ऐनवेळी अशी पळापळी दिसू शकते. त्यामुळे ही गळती रोखण्याचे आव्हान महायुतीतील तिन्ही पक्षांपुढे आणि खास करून भाजप आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीपुढे आहे. भाजपला विदर्भातही अनेक धक्के बसू शकतात. या आव्हानांसोबतच लोकसभेच्या वेळी गमावलेला जनाधार पुन्हा प्राप्त करून घेण्याचे आव्हान महायुतीसमोर असेलच. लोकसभेत दलित आणि मुस्लिम मतदारांनी भाजप आघाडीच्या विरोधात एकगठ्ठा मतदान केले. तसे पुन्हा होणार नाही यासाठी युतीला काळजी घ्यावी लागेलच, त्यासोबतच मराठा आणि ओबीसी मतदारांची नाराजीही युतीला दूर करावी लागेल. मनोज जरांगेमुळे महायुतीला लोकसभेत मराठवाडा आणि काही प्रमाणात प. महाराष्ट्रात मोठा फटका बसला. अजूनही मराठा समाजाचा रोष कमी झालेला नाही, त्यातच मराठा समाजाचे हे सरकार अधिक लाड करीत आहे, असा संदेश गेल्यामुळे राज्यातील ओबीसी समाजही महायुतीवर नाराज आहे, त्याचा दुहेरी फटका लोकसभेत बसला होता, त्यामुळे दोन्ही समाजांची समजूत काढण्याचे अतिशय अवघड काम महायुतीला करावे लागेल. लोकसभा निवडणुकीत महायुतीचे उमेदवार जवळपास १२५ विधानसभा मतदारसंघामध्ये आघाडीवर होते तर महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी १५० पेक्षा अधिक मतदारसंघात आघाडी मिळविली होती. ही दरी कमी झाली नाही किंवा अधिक रुंदावली तर महायुतीला सत्ता गमवावी लागेल. लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून महिला वर्गाला आकर्षित करण्याचा प्रयत्न महायुतीकडून सुरू आहे, त्याचे सकारात्मक परिणामही कदाचित निवडणुकीत दिसून येतील परंतु इतर अनेक घटकांची नाराजी महायुतीसाठी काळजीचा विषय ठरू शकते. कदाचित म्हणूनच निवृत्ती वेतनासंदर्भात केंद्र सरकारने लागू केलेल्या नव्या योजनेची राज्यातही तत्काळ अंमलबजावणी करण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकार घेऊ शकते. जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करा म्हणून महाराष्ट्रातील कर्मचारी संघटनांनी यापूर्वी मोठे आंदोलन केले होते, त्याचा फटका शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीला बसला होता, आताही २९ ऑगस्टपासून संपावर जाण्याचा इशारा या संघटनांनी दिला आहे, त्यामुळे त्यांची नाराजी दूर करण्यासाठी केंद्र सरकारच्या धर्तीवर नव्या निवृत्ती वेतन योजनेला सरकार मंजूरी देणार हे जवळपास निश्चित आहे. अशा अनेक घोषणांमुळे सरकारच्या तिजोरीवर प्रचंड ताण पडणार आहे, खरे तर सरकारच्या उत्पन्नातून हा सगळा खर्च भागविणे शक्यच नाही, त्यासाठी नवे कर्जच घ्यावे लागेल, परंतु सध्या तरी हा पुढचा विचार करण्याची गरज महायुती सरकारला वाटत नसल्याचे दिसते. युती सरकारच्या लाडकी बहिण योजनेची परिणामकारकता कमी करण्यासाठी विरोधकांकडून बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कृषी उत्पादनांना पुरेसा भाव न मिळणे, महाराष्ट्रातील उद्योग इतर प्रांतात आणि खास करून गुजरातला जाणे अशा काही मुद्यांवरून सरकारला अडचणीत आणण्याचा प्रयत्न होऊ शकतो. एकूणच महायुतीसमोर सत्ता टिकविण्यासाठी मोठे आव्हान उभे आहे, असे दिसते.

चिंता विभाजनाची...!

आम आदमी पक्षाने महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुकीत सगळ्या जागा लढविण्याचे ठरविले आहे. मुंबईतील सगळ्या ३६ जागांवर आम आदमी पक्ष लढणार असल्याचे त्या पक्षाच्या नेत्या प्रीती शर्मा यांनी सांगितले. मराठवाड्यातील काही जागांसाठी तर पक्षाने उमेदवारही घोषित केले आहे. राज ठाकरेंची मनसेदेखील २२५ जागा लढविण्याची तयारी करीत आहे, राज ठाकरेंनीही आपले काही उमेदवार घोषित केले आहे. तिकडे राजू शेट्टी तिसरी आघाडी उभी करण्याच्या प्रयत्नात आहेत. कोल्हापूरच्या संभाजी राजेंनी मनोज जरांगे यांची भेट घेत निवडणुकीत आघाडी करण्याची तयारी दर्शविली आहे. ओवेसींचा एमआयएम महाविकास आघाडीत येण्यास उत्सूक असला तरी एमआयएम मुळे फायदा कमी आणि नुकसानच अधिक होण्याची शक्यता असल्याने महाविकास आघाडीच्या नेत्यांनी त्याबाबत फारशी उत्सूकता दाखविलेली नाही. त्यामुळे एमआयएमदेखील स्वतंत्रपणे या निवडणुकीत उतरण्याची शक्यता आहे. याचा परिणाम म्हणून बव्हंशी मतदारसंघात बहुरंगी लढती होऊ शकतात. अर्थात मुख्य लढत महायुती आणि महाविकास आघाडीतच होईल, परंतु काही मतदारसंघात हे अन्य उमेदवार युती किंवा आघाडीचा खेळ बिघडविण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यातही राज ठाकरे वगळता इतर सगळेच घटक महाविकास आघाडीसाठी डोकेदुखी ठरू शकतात. राज ठाकरेंची भूमिका थोडी कोड्यात टाकणारी असली तरी मनसेच्या माध्यमातून उद्धव ठाकरे गटाच्या मतदारांमध्ये विभाजन घडवून आणण्याचा डाव असल्याचे बोलले जात आहे. कदाचित काही मतदारसंघात महायुतीकडून मनसेच्या उमेदवारांना अप्रत्यक्ष पाठिंबा दिला जाऊ शकतो. लोकसभेच्या वेळी मतविभाजन टाळण्यात विरोधी आघाडीला यश आले होते, परंतु विधानसभा निवडणुकीत मतविभाजन होणे अपरिहार्य आहे. या मतविभाजनाचा सर्वाधिक फटका कोणत्या आघाडीला बसतो यावरही बरेच काही अवलंबून असेल. सध्याच्या परिस्थितीत दोन्ही आघाड्यांमध्ये चुरस दिसून येत असल्याने काही हजार मते प्राप्त करणारे अन्य उमेदवारही दोन्ही आघाड्यांसाठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यातही महाविकास आघाडीसाठी हे मतविभाजन अधिक चिंतेचे कारण ठरणार आहे.

स्टेट लाइन

बदलापूरमधील उद्रेक...

डॉ. सुकृत खांडेकर
9594224000
sukritforyou@gmail.com

चार वर्षांच्या दोन चिमुरड्या मुलींवर मुंबईपासून जवळच असलेल्या बदलापूरमध्ये शाळेच्या सफाई कर्मचाऱ्याकडून शाळेतच अत्याचार झाल्याच्या घटनेने सारा महाराष्ट्र हादरला. विनयभंग, अपहरण, अत्याचार, बलात्कार, सामूहिक बलात्कार, बलात्कार करून निर्घृण हत्या, अशा घटना राज्यात व देशात सतत घडत आहेत; पण पुरोगामी व प्रगत समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात मध्य रेल्वेच्या मार्गावर मुंबईचे विस्तारीत उपनगर म्हणून ओळख असलेल्या बदलापूरमध्ये दोन बालिकांवर शाळेत अत्याचार झाले ही घटना भयावह व थरकाप निर्माण करणारी होती. १२ आणि १३ ऑगस्टला शाळेत ही घटना घडली. बदलापूरमधील नामांकित शाळेत की जेथे बाराशे मुले शिकतात, तेथे हे दुष्कृत्य कोणालाच कळू नये याचे मोठे आश्चर्य वाटते.

पश्चिम बंगालमधील कोलकाता येथील आरजे कर या सरकारी रुग्णालयात एका ट्रेनी डॉक्टरवर झालेला सामूहिक बलात्कार व तिची झालेली निर्घृण हत्या या घटनेवर देशभर संताप प्रकट झाला आणि सर्वोच्च न्यायालयाने या घटनेची आपणहून दखल घेतली, तसेच बदलापूरच्या घटनेनंतर बदलापूरसह राज्यात अनेक शहरात संताप प्रकट झाला, तसेच या घटनेची मुंबई उच्च न्यायालयाने आपणहून दखल घेऊन पोलीस-प्रशासनाला खडे बोल सुनावले.

बदलापूर दुष्कृत्याच्या घटनेची शाळेला माहिती कधी मिळाली व शाळेने त्यानंतर तत्परतेने काय कारवाई केली? अत्याचारग्रस्त मुलींना सरकारी रुग्णालयात कधी नेले व त्यांच्यावर उपचार वेळेत झाले काय? त्या मुलींची तपासणी व उपचार करण्यात हयगय झाली काय? घटना घडल्यावर एफआयआर नोंदवण्यास विलंब का लागला, त्याला कोण जबाबदार आहेत? मुलींचे आई-वडील पोलीस स्टेशनवर गेले असताना त्यांना दहा तास बसवून का व कोणी ठेवले? पोक्सो कायद्याअंतर्गत पोलिसांनी गुन्हा का दाखल केला नाही? या घटनेत शाळा, सरकारी रुग्णालय, पोलीस स्टेशन हे तिन्ही घटक गुंतलेले आहेत. त्यांच्यावर काय कारवाई झाली? पीडित मुलींचे जबाब घेण्यास पोलिसानी विलंब का केला?

समाज संतप्त झाला, जमाव रस्त्यावर आला, घोषणा, तोडफोड सुरू झाली की, मग व्यवस्थेला जाग येते, तोपर्यंत सर्व काही सुस्त असते, तोच अनुभव बदलापूरच्या घटनेनंतर आला. चार वर्षांच्या मुलींवर अत्याचार झाल्यावर त्या दोन- तीन दिवस कुणाला काही बोलल्याच नाहीत. त्यांची शारीरिक व मानसिक अवस्था काय असेल, त्यांनी त्रास व वेदना कशा सहन केल्या असतील? त्यांच्या बालमनाला किती यातना झाल्या असतील, त्यांच्या शरीरावर झालेल्या जखमा व ओरखडे त्या आयुष्यभर विसरू शकणार नाहीत, याचा कोणी विचार केला आहे काय? आरोपीवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे राज्यकर्ते नेहमीच सांगत असतात. निर्माण झालेला जनक्षोभ शांत करण्यासाठी ते असे बोलत असतात; पण सर्वसामान्य लोकांचा पोलीस व प्रशासनावरचा विश्वास उडाला आहे म्हणूनच बदलापूरच्या रस्त्यांवर व रेल्वे मार्गावर हजारोंच्या संख्येने ठिय्या आंदोलन झाले ना... शाळेच्या मुख्याध्यापिका महिला आहेत, पोलीस स्टेशनच्या उपनिरीक्षक महिला आहेत, त्यांची बदली करूनही जमाव शांत झाला नाही. पोलीस महानिरीक्षक दर्जाच्या महिलेच्या नेतृत्वाखाली एसआयटी स्थापन केल्याची घोषणा सरकारने केली तरी रेल्वे मार्गावरून जमाव हटायला तयार नव्हता. आजवर अनेक मुद्यांवर एसआयटी स्थापन झाल्या. त्यांचे पुढे काय झाले, अशा अहवालावर कधी विधिमंडळात चर्चा झाली आहे का? एसआयटी अहवालानंतर किती आरोपींना फाशी किंवा जन्मठेप अशा शिक्षा झाल्या? पोलिसांचे निलंबन किंवा बदल्या ही थातूरमातूर कारवाई आहे. निलंबित केलेल्या पोलिसांना पुन्हा सेवेत घेऊन त्यांना मलईदार पोस्टिंग दिली जातात, असे यापूर्वी घडलेले आहे.

सरकारी यंत्रणा ही जनतेच्या सुरक्षिततेसाठी व कल्याणासाठी आहे, याचा कर्मचारी व अधिकाऱ्यांना विसर पडलेला असतो. बदलापूर रेल्वे स्टेशनवर दिवसभर हजारोंचा जमाव ठिय्या मांडून होता. पोलिसांचे त्यांनी ऐकले नाही. समजूत घालायला आलेल्या गिरीश महाजन या मंत्र्यांचेही ऐकण्याच्या मनःस्थितीत लोक नव्हते. मंत्र्यांच्या समोरच जमावातून फाशी फाशी अशा घोषणा दिल्या जात होत्या. संतप्त जमावाकडे कोणत्याही राजकीय पक्षांचे बॅनर्स किंवा झेंडे नव्हते. पण नाही पाहिजे, आम्हाला तुमचे १५०० रुपये, आम्हाला आमची बहीण, मुलगी सुरक्षित पाहिजे, याची हमी द्या. त्या नराधमाला फाशीची शिक्षा झालीच पाहिजे, असे रंगवलेले फलक आंदोलकांनी फडकवले. या लोकांच्या भावना होत्या; पण राज्यकर्त्यांनी माझी लाडकी बहिणीचे रंगवलेले फलक अचानक कोठून आले असा प्रश्न पडला. बदलापूरचे आंदोलन हे सरकारविरोधी कट-कारस्थान आहे, योजनाबद्ध आहे असा सूर सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी लावला. आंदोलकांमध्ये उबाठा सेनेचे लोक घुसले आहेत, ते बदलापूरबाहेरून आले आहेत, असेही आरोप झाले. त्यातच माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे यांनी एका महिला पत्रकाराला उद्देशून काही आक्षेपार्ह टीप्पणी केली म्हणून वादात आणखी भर पडली.

बदलापूरमध्ये जनतेच्या संतापाचा उद्रेक झाला नसता, तर शाळेतील दुष्कृत्याची घटना बाहेर आली असती का? शाळा, पोलीस, इस्पितळाने केलेली दिरंगाई जनतेला समजली असती का? एसआयटीची घोषणा झाली असती का? खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्याचा व विशेष सरकारी वकील नेमण्याचा निर्णय झाला असता का?

राज्यातील सर्व एक लाख शाळांमध्ये सीसीटीव्ही आणि सखी सावित्री समिती आवश्यक आहे, असा शासकीय आदेश २०२२ मध्ये जारी झाला होता. बदलापूरच्या शाळेत सीसीटीव्ही होते का, असल्यास ते चालू स्थितीत होते का, सखी सावित्री समिती अस्तित्वात होती का, याचीही चौकशी होणे गरजेचे आहे. लहान मुलांना, मुलींना वॉशरूम नेण्याचे काम शाळांमध्ये मावशी करते, मग या शाळेत मावशी आहे का, सफाई कामगारावर त्या मुलींना नेण्याची जबाबदारी कोणी सोपवली?

लोकांच्या संतप्त भावना उफाळल्या म्हणून उद्रेक झाला; पण पोलिसांना ते समजलेच नसावे. पोलीस स्टेशनला महिला अधिकारी असतात. त्यांना पोक्सोची माहिती असते. त्या प्रशिक्षित असतात. बदलापूर पोलीस स्टेशनला प्रशिक्षित व कायद्याची उत्तम माहिती असणारे अधिकारी होते का? फास्ट ट्रॅक कोर्ट म्हणजे काय, त्यासाठी काय करावे लागते, याची माहिती पोलिसांना नीट आहे का? गुन्हा नोंदवायला पोलिसांनी अक्षम्य विलंब का लावला? सरकारी वकील हे सक्षम असताना विशेष सरकारी वकील नेमण्यामागे सरकारचा हेतू काय? पोलिसांनी लाठीमार केल्यावर ठिय्या आंदोलनातून जमाव पांगला, तरी चिमुरड्या बालिकांवर झालेल्या अत्याचारांचे गांभीर्य कमी होत नाही. बदलापूरच नव्हेच, तर सर्वसामान्य माणसाच्या मनात बदलापूरच्या दुष्कृत्याविषयी कमालीची चीड आहे. आरोपी फासावर कधी लटवला जातोय याची महाराष्ट्रातील जनता वाट पाहत आहे.

थर्ड अम्पायर

जपानपासून भारताला एखादा तरी मंत्र घेता येईल!

जयंत महाजन
9420691420

जगाच्या पाठीवरील अनेक देशांची ठराविक व खास वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे जगाच्या पाठीवरील सर्वात दोन मोठे अणूबॉम्ब पडलेल्या जपानने फिनिक्स पक्षाप्रमाणे राखेतून भरारी कशी घेतली असावी, याचे कोडे अनेकांना पडलेले असतेच. त्यामुळेच जपानच्या इतिहासात ६ आणि ९ ऑगस्ट १९४५ या दोन तारखा म्हणजे काळ्याकुट्ट इतिहासाचे एक पानच आहे. म्हणूनच ६ ऑगस्टला जपानला जाऊन हिरोशिमा पहायचेच, असे स्वप्न पूर्ण करण्यासाठी काही जणांची टीम ५ ऑगस्टला विमानाने मुंबईहून हिरोशिमाच्या दिशेने निघाली. ज्या ठिकाणी ६ ऑगस्ट १९४५ ला अणूबॉम्ब पडला त्या ठिकाणी जाऊन पोहोचलो आणि तेथील संपूर्ण परिस्थितीचे अवलोकन केल्यानंतर ओले डोळे घेऊनच हॉटेलवर परतावे लागले. बरोबर असलेले कोणीही कोणाशी बोलत नव्हते. माणूस इतका क्रूर असू शकतो का? यावरदेखील विश्वास बसत नव्हता. कारण एकाच दिवसात दीड ते अडीच लाख लोक तडफडून रस्त्यावर मरून पडतात व जखमींची संख्या कोट्यवधींच्या घरात हे चित्र मनाला पटेल का? पण जपानवासीयांनी ते भोगले आहेत. मुळातच सरासरी आयुर्मान शंभरीच्या घरात असलेल्या जपानमध्ये ती पिढी अजूनही अस्तित्वात आहे ज्यांनी तो अनुभव घेतला आहे. अण्वस्त्रांचा एकमेव वापर झालेला जपान कोलमडून पडेल असे वाटत होते. जळालेले चेहरे, तुटलेले हातपाय, मृतदेहांचे थर ६ ऑगस्ट १९४५ ला दिसत होते. 'लिटल बॉय'चा धमाका झाला आणि एका क्षणात होत्याचे नव्हते हिरोशिमात झाले होते. ते कमी होते की काय तेवढ्यात ९ ऑगस्ट १९४५ ला नागासाकी शहरावर 'फॅट मॅन' कोसळला आणि नागासाकीतल्या ७४ हजार जणांचा जीव जागीच गेला. याचे अगदी एका शब्दात उत्तर द्यायचे म्हणजे, जगात आपल्या सामर्थ्याची दहशत निर्माण करण्यासाठी अमेरिकेने जपानवर अणुहल्ला केला, असे मत या विषयाचे अभ्यासक प्राचार्य डॉ. किशोर पवार, प्राचार्य बाबाजी आहेर, शारीरिक क्रीडा संचालक प्रा. माणिकराव गायकवाड यांचे झाले.

दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने जपानवरच अणुबॉंब का टाकले? खरेतर जपानवर एक नाही तर दोन अणुबॉम्ब टाकणे हे कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय असू शकत नाही. हे बॉम्ब हिरोशिमा आणि नागासाकीच्या मध्यवर्ती रहिवाशी भागामध्ये टाकले गेले. त्यात लष्करी आस्थापना उद्ध्वस्त करण्यापेक्षा सामान्य नागरिकांचे शिरकाण करणे हाच उद्देश स्पष्टपणे कळून येतो, असे अभ्यासक साहेबराव साळुंखे, हरिभाऊ टिळे, प्रा. टी. बी. साळुंखे यांचाही दावा आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला जपान हा एक बलाढ्य लष्करी देश होता. जपानने रशिया आणि चीनचा युद्धात पराभव केला होता. युरोपीयन देशांप्रमाणे जपानचे साम्राज्यविस्तार करणे हे ध्येय होते. त्यामुळेच दुसरे महायुद्ध सुरू होताच जपानने इंग्लंड आणि फ्रान्स या तत्कालीन साम्राज्यवादी सत्तांच्या विरोधात युद्धामध्ये उडी घेतली. पॅसिफिक महासागरावर वर्चस्व निर्माण करण्यासाठी जपानने 'पर्ल हार्बर' या अमेरिकेच्या नाविक तळावर हल्ला केला. म्हणूनच जपानची ही कृती अमेरिकेला सहन झाली नाही व जपान मोठ्या संकटात सापडला, असे मत प्रा. विष्णू बागूल, सनदी अधिकारी बाळासाहेब शेवाळे यांच्यासह राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या मधुकर जाधव यांचे झाले.

रशियाप्रमाणेच अमेरिकेलाही जगाला आपली शक्ती दाखवायची होती. पर्ल हार्बरच्या हल्ल्यानंतर जपानला कायमची अद्दल घडवावी, अशी अमेरिकेतल्या मोठ्या जनमानसाची इच्छा होती. या सर्वांमधूनच अमेरिकेने जपानवर हा हल्ला केला. परिणाम माहिती असूनही अमेरिकेने जपानवर अणुहल्ला का केला? हे मात्र मोठे विस्मयकारक कोडे ठरते, असे मत प्रा. डॉ. रमेश खैरनार, उद्योजक दादा माळी, के. के. चव्हाण यांनी व्यक्त केले; पण परिणाम स्पष्ट होताच अमेरिकन नागरिकदेखील व्यथित झाले होते. असे म्हटले जाते की, अणुबॉम्ब टाकला नसता तर जपानने अमेरिकेचे पाच- सहा लाख सैनिक मारले असते. हिरोशिमा- नागसकीचे काही लाख नागरिक बळी देऊन अमेरिकेने त्यांचे काही लाख सैनिक वाचवले. त्यात बरेच तथ्य असल्याचे मत अर्थविषयक अभ्यासक प्रभाकर मोगल, पी. डी. जाधव, भगवंतराव जगताप, प्रा. बच्छाव यांचे आहे.

संपूर्ण देशाची राख रांगोळी होऊनही ज्या काही महत्त्वाच्या बाबींमुळे जपानने प्रचंड प्रगती केली, त्यापैकी एखादा गुण जरी भारतीय जनतेने घेतला तरी आपला देश जगाच्या पाठीवर प्रचंड भरारी घेईल. जपानची कामसू वृत्ती, त्यांचा वक्तशीरपणा, कामावर

असलेली प्रचंड निष्ठा, भ्रष्टाचारापासून कोसो मैल दूर व सर्वात महत्त्वाचे म्हणजे तेथील स्वच्छता. भारतातून गेलेले शिष्टमंडळ तेथील स्वच्छता पाहूनच भारावून जाते. जपानमध्ये गेल्यावर भारतीय नागरिकदेखील तेथील स्वच्छतेचे चाहते बनून जातात. भारतात आल्यानंतर चॉकलेटचा रॅपर देखील रस्त्यावर टाकण्याची कोणत्याही भारतीयाची हिंमत होत नाही. एवढेच नव्हे तर जपानमध्ये तुमच्या खोलीत किंवा वाहनात कचरा झाला, तर तो तुम्ही खांद्यावर घेऊन कचराकुंडीतच टाकणार अशी शिकवणच तेथे मिळते. कारण जपानने त्यांना जणू ती शिकवणच दिलेली असते. नैसर्गिक व मानवी आपत्ती आल्यानंतर एखादा देश केव्हाच कोसळून गेला असता; परंतु वरील गुणांमुळे पुन्हा उभे राहायचे व तेदेखील सक्षमतेने हे फक्त आजपर्यंत जपानलाच जमले आहे. म्हणूनच म्हटले जाते की, जपानने स्वतःची ज्याप्रकारे प्रगती केली त्याप्रमाणे भारतीयांनी त्यांच्याकडून काही अवगत केले, तर भारत देखील खऱ्या अर्थाने महासत्ता बनू शकेल!

मनाचिये गुंती

लैंगिक शिक्षण: काळाची गरज!

वैशाली पाटील
9420350171

या महिन्यात देशात कोलकाता आणि बदलापूर येथे अतिशय लज्जास्पद आणि विकृत अशा घटना घडल्या आहेत. या घटना पहिल्यांदा घडल्या नाहीत..अनेक वेळा स्त्रियांवर, कोवळ्या मुलींवर अमानवी, निर्घृण शारीरिक अत्याचार झाले आहेत. अशा घटनांचे सातत्याने निषेधही होतात; पण त्यातून चांगले निष्पन्न होतच नाहीय..या घटना घडण्यामागे सोशल मीडिया वरील पोर्नोग्राफी, गेम्स, समवयस्क दबाव, अनुकरण या गोष्टी आहेतच. त्यामुळे कामोत्तेजना, उत्सुकता वाढते. प्रलोभने दाखविली जातात. इ. सोबतच विकृत मानसिकता आणि लैंगिक शिक्षणाचा अभाव हीसुद्धा प्रमुख कारणे आहेत.

आपल्याकडे अजूनही प्रत्येक घरात लैंगिक शिक्षणावर बोलले जात नाही. त्याची गरज समजून घेतली जात नाही आणि चर्चाही केली जात नाही..वेळ आली की कळते आपोआप, असे सांगितले जाते. शिकवले गेले तरी फक्त मुलींना थोडफार सांगितले जाते, कारण त्यांना मासिक धर्माच्या चक्रातून जावे लागते म्हणून त्यासाठी लागणारी स्वच्छता आणि सॅनिटरी नॅपकीन वापरण्यापर्यंतच सांगितले जाते. लैंगिक शिक्षणामध्ये शयन गृह आणि त्यातील कौशल्य, जोडीदाराची खुशी याबद्दल शिक्षण दिले जात नाही. लैंगिक ओळख, शारीरिक रचना, व्यक्तिगत अंगांची ओळख, त्यांचे कार्य, स्वच्छता, भिन्नलिंगी व्यक्तिमत्त्वाचे आकर्षण, लैंगिक संबंधांसाठी योग्य वय, त्यासाठी लागणाऱ्या जोडीदाराची निवड, सामाजिक नियम- निर्बंध, लैंगिक संसर्गजन्य रोग, गुप्तरोग यासंदर्भात योग्य रीतीने मार्गदर्शन करणे म्हणजेच लैंगिक शिक्षण देणे असते. पालकांनी मुलांना विश्वासात घेऊन चर्चाही करायला हवी.

good touch, bad touch यांचे ज्ञान दिले गेले पाहिजे म्हणजे बालशोषण रोखता येईल. अनेकदा आपल्यासोबत नक्की काय घडत आहे याची जाणीव मुला- मुलींना नसते. सक्तीला विरोध करणे, मोठ्या व्यक्तीच्या कानावर घालणे याचीही धास्ती वाटते. त्यांना झेपेल, अशी दृक्श्राव्य माध्यमे, चित्रे, मॉडेल्स वापरून नियंत्रित वातावरण निर्मिती करून संवेदनशीलरित्या हे समजावले जाऊ शकते. त्यासाठी असणारी हेल्प लाईन, कायदे यांची माहिती दिली पाहिजे. यामुळे लैंगिक भावनेतून येणारे शारीरिक, मानसिक विकारयुक्त वर्तन टाळण्यासाठी भावनांचा आवेग संयमित होऊन, विवेकपूर्ण वर्तन घडेल. आणि Sex with pleasure व sex with shame यांतला फरक समजेल. लहान वयात प्रेमाच्या नावाखाली होणारा sex चा 'चोरखेळ' थांबेल. कामप्रेरण नैसर्गिक असले तरी; तहान, भूक, निद्रा यांसारखी अत्यावश्यक गरज नाही, तिचे नियंत्रण करता येऊ शकते. लैंगिक शिक्षणाप्रति विरोधी मते असली, तरी जमेच्या बाजूही आहेत. Good sexual health साठी social and moral behaviour साठी ते गरजेचे आहे. चारित्र्यवान, संतुलित होण्यासाठी व समाज स्वास्थ्यासाठी लैंगिक साक्षरता लाभदायी ठरेल!!

वाचक विचार मंच

सण साजरा करू या, इव्हेंट नको!

गेल्या काही वर्षांत मुंबई-ठाण्यात आणि सर्वत्रच ज्या पद्धतीने दहीहंडी उत्सव साजरा केला जातो ते पाहून दहीहंडीच्या सणाचे पावित्र्य केव्हाच संपले असल्याचे आणि त्याला बाजारू स्वरूप आल्याचे ठळकपणे दिसून येते. या पवित्र सणाचे 'अर्थपूर्ण राजकीयीकरण' झाल्यानंतर या सणाचे इव्हेंटमध्ये रूपांतर झाले. आता अधिकाधिक थरांच्या उंचीची दहीहंडी बांधण्यासाठी विविध राजकीय पक्षांच्या आयोजकांमध्ये मोठी स्पर्धा लागते. ज्यांचे थर अधिक त्यांचा गाजावाजा अधिक. त्यामुळे जखमी होणाऱ्या गोविंदांची संख्याही अधिक. दुर्दैवाने गेल्या काही वर्षांत यात सहभागी गोविंदांना काहींना कायमचे अपंगत्व आले, तर काही मृत्युमुखी पडले. दहीहंडी उत्सवाचा असा जीवघेणा व्यावसायिक इव्हेंट करण्यापेक्षा हा पावित्र्याचा सण पूर्वीसारखाच पारंपरिक पद्धतीने साजरा करणे सर्वांच्याच हिताचे होईल.

-प्रदीप शंकर मोरे
मुंबई, मो. नं.: ९८७०७७७२७४

सावधान..! समाज विकृत होतोय!

अजमेर, दिल्ली, कोलकाता, बदलापूर, तसेच अकोला, कोल्हापूर, दौंड, यवतमाळ, वाशिम, नागभीड, नालासोपरा येथील घडलेल्या असंख्य स्त्री आणि बाल अत्याचारांच्या श्रृंखला समाज विकृतीचे लक्षण दाखवितात. स्त्रीभ्रूणहत्येमुळे स्त्री गर्भात सुरक्षित नाही. घरात, शाळेत, कामाच्या ठिकाणी, बस, रेल्वे, विमान, सार्वजनिक स्थळे, रुग्णालये, शासकीय आणि निमशासकीय कार्यालये, एवढेच काय, तर मठ-आश्रमालयेसुद्धा सुरक्षित नाहीत. याला समाज विकृतीचे लक्षण म्हणायचे नाही तर काय?

पोलिसांचे काम आहे गुन्हेगाराला पकडायचे. शासनाचे काम कठोर कायदे करायचे. न्यायालयांचे काम शिक्षा देण्याचे. ही प्रक्रिया अनेक वर्षांपासून सुरू आहे. तरीसुद्धा स्त्री अन्याय- अत्याचाराचा आलेख का वाढतो आहे? आज नीती मूल्यांची, सुसंस्काराची शाळा बंद नाही का वाटत? ज्या संस्कृतीत स्त्रीला पूज्यनीय मानले जाते, मुले देवाघरची फुले मानली जातात त्याच देशात नैतिक अधःपतन होत आहे. समाज विकृतीला समाजच जबाबदार आहे. विकृत समाजाला सुसंस्कारित करण्याची सामूहिक जबाबदारी समाजाचे घटक म्हणून आपल्या सर्वांवर येऊन ठेपलेली आहे.

शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ, मो. नं.: ९१३०८३५४५८

धुळमस

सबका साथ
एकमेकांच्या नावाने
कण्या कांडतात
बघा बरं नेते कसे
आपसात भांडतात
मतभेद आहेत भरपूर
ह्याबद्दल दुमत नाही
तुझं माझं जमत नाही
तुझ्याविना करमत नाही
कुंकू पुसून मंगळसूत्र
खुंटीला बांधतात
कळत नाही तरी कसे
एका घरात नांदतात?
ही एक गोष्ट आमच्या
मुळीच येत नाही लक्षात
घटस्फोट घ्यायचा ना?
तरी शयनकक्षात?
हेच अंतिम सत्य
भांडणात नसते तथ्य
स्वार्थातूनच जन्म घेते
सत्ता, संपत्तीचे अपत्य

ॲड. अनंत खेळकर, अकोला

संवाद

गरीब श्रीमंत यातील दरी मोठ्या प्रमाणात..

मागील पाच वर्षांचा काळ लक्षात घेतला, तर असे लक्षात येते की जगातील श्रीमंत अति श्रीमंत झाले आहेत व गरीब अति गरीब होत चालले आहेत. कोरोना संकट, त्यानंतर जगभर उसळलेली बेकारी, अनेक कंपन्यांवर आलेले संकट, अशा अनेक कारणांमुळे अर्थव्यवस्था मोडकळीस आली. त्याचा मोठा फटका गरिबांना बसला. त्यांची परिस्थिती आणखी गरिबीची झाली. जगातील पाच श्रीमंत व्यक्तींच्या संपत्तीत गेल्या चार वर्षांत सुमारे १४४ टक्के एवढी प्रचंड वाढ झाली आहे. त्यांच्या जवळ एवढी संपत्ती आहे, की त्यांनी दररोज जरी पाच कोटी रुपये खर्च केले तरीही त्यांचे पैसे संपायला तब्बल पाचशे वर्षे लागतील.

अमेरिकेतील ऑक्सफॅम इंटरनॅशनल या संस्थेने दिलेल्या अहवालानुसार श्रीमंतांच्या संपत्तीत प्रचंड वाढ झाली आहे. जगातील पाच उद्योगपतींची संपत्ती गेल्या चार वर्षांत ४०५ अमेरिकन डॉलर्स वरून ८६९ अमेरिकन डॉलर्स एवढी झाली आहे. एका आकडेवारीनुसार हे उद्योगपती प्रत्येक तासाला ११४ कोटी रुपयांहून अधिकची कमाई करतायेत. असाच संपत्तीचा वेग वाढत राहिल्यास पुढील दहा वर्षांत जगात अनेक खरब पती तयार होतील. जगातील एक टक्का असलेल्या श्रीमंत लोकांकडे तब्बल ४३ टक्के संपत्ती आहे. टेस्ला कंपनीचे मालक

आईसलंडमध्ये पडला काकडीचा दुष्काळ

बाजारात काकड्याच नाही

आईसलंड : जग अद्भूत लोकांनी भरलेले आहे. प्रत्येकाचे काही ना काही वैशिष्ट्य असते. पण त्यातही काही लोक आपल्या एखाद्याच कृतीमुळे अशी करामत करुन दाखवितात की इतर लोक त्यामुळे आचंबित होतात. एका स्वयंपाक्यामुळे एका देशात काकड्यांचा दुष्काळ पडला आहे. काकडीपासून विविध चविष्ट आणि स्वादिष्ट पदार्थ बनविणाऱ्या एका स्वयंपाक्याने इंटरनेटवर काकड्यांच्या विविध पदार्थांची पाककृती देण्यास काही दिवसांपूर्वी प्रारंभ केला होता. त्याच्या या पाककृती इतक्या लोकप्रिय ठरल्या, की आईसलंड या देशात बाजारात काकड्याच मिळेनाशा झाल्या आहेत. आईसलंड हा देश आकाराने तसा मोठा असला तरी तरी तेथील लोकसंख्या अत्यंत अल्प आहे. अतिशीत हवामानामुळे त्या देशात फारसे कोणी रहावयास जात नाही. या देशात काकड्या याआधी फारशा लोकप्रिय नव्हत्या. पण या स्वयंपाक्याच्या पाककृतींमुळे त्यांची लोकप्रियता प्रचंड वाढली.

मॅमथच्या हाडांनी निर्मित महालाचा शोध; पाहून तज्ज्ञ अवाक्

वृत्तसंस्था

मॉस्को : रशियाची राजधानी मॉस्कोच्या दक्षिणेत झालेल्या एका अनोख्या शोधामुळे वैज्ञानिक चकित झाले आहेत. तेथे सुमारे ४० हजार वर्षे जुन्या मॅमथच्या (हजारो वर्षांपूर्वी विलुप्त झालेला दैत्याकार प्राणी) अवशेषांद्वारे निर्मित एक रहस्यमय 'हाडांचा महाल' शोधण्यात आला आहे. ही संरचना हाडांच्या मदतीने तयार करण्यात आली असल्याने या अस्थी अवशेषांना आतापर्यंत मिळालेले सर्वात जुने आणि सर्वात मोठे मॅमथ हाउस मानले गेले आहे. या स्थानावर अवशेष मूळ स्वरुपात काही वर्षांपूर्वी मिळाले होते, परंतु नव्या संशोधनातून विशाल आकाराची हाडं ४० हजार वर्षे जुनी असल्याचे स्पष्ट झाले आहे.

भारतीय नौदलाचा पराक्रम पाहून अमेरिका प्रभावित!

वृत्तसंस्था

वॉशिंग्टन : भारतीय नौदलाने येमेनच्या हौथींसारख्या चाचे आणि अतिरेक्यांच्या तावडीतून सुटका केल्याचे पाहून अमेरिकेला भारताच्या शौर्याची खात्री झाली आहे. गेल्या काही महिन्यांत जगातील विविध देशांच्या जहाजांवर झालेल्या हल्ल्यांची माहिती मिळताच भारतीय नौदल विश्वबंधूच्या रूपाने त्यांच्या रक्षणासाठी देवदूताच्या भूमिकेत आले आहे. जवळपास सर्वच हल्ल्यांमध्ये भारतीय नौदलाने समुद्री चाच्यांना आणि हल्लेखोरांना परावृत्त करून परदेशी जहाजे आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांचे संरक्षण केले आहे. त्यामुळे भारतीय नौदलाच्या सामर्थ्यावर अमेरिका भुरळ पडली आहे. त्यामुळे त्यांनी आता भारतासोबत एकत्र काम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

वॉशिंग्टन डीसी : भारताचे संरक्षणमंत्री राजनाथसिंग आणि अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलीव्हन यांच्यात महत्वपूर्ण संरक्षण आणि गुप्त माहिती आदानप्रदान या विषयांवर व्यापक चर्चा झाली आहे. राजनाथसिंग सध्या अमेरिकेच्या चार दिवसांच्या दौऱ्यावर असून भारत आणि अमेरिका यांच्यात मोठे संरक्षण करार करण्यात आले होते.

११ मच्छिमारांना श्रीलंकेच्या नौदलाकडून अटक

वर्षभरातील संख्या ३३३ वर पोहोचली

कोलंबो : श्रीलंकेच्या नौदलाने आणखी ११ भारतीय मच्छिमारांना देशाच्या सागरी हद्दीत अवैधपणे मासेमारी केल्याप्रकरणी अटक केली आहे. यामुळे या वर्षी अटक करण्यात आलेल्या भारतीय मच्छिमारांची एकूण संख्या ३३३ वर पोहोचली आहे. तर जप्त करण्यात आलेल्या ट्रॉलरची संख्या ४५ झाली आहे. शुक्रवारी उत्तर प्रांतातील जाफना येथील पॉइंट पेड्रोच्या किनारपट्टीवर भारताच्या ११ मच्छिमारांना अटक करण्यात आली आणि त्यांचा ट्रॉलर जप्त करण्यात आला, असे श्रीलंकेच्या नौदलाने प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

नागार्जुनचे कन्व्हेन्शन सेंटर केले जमीनदोस्त

हायड्राने केली कारवाई

वृत्तसंस्था

हैदराबाद : हैदराबाद डिझास्टर मॅनेजमेंट अँड प्रॉपर्टी प्रोटेक्शन एजन्सी (हायड्रा) ने तेलंगणातील प्रसिद्ध तेलुगू अभिनेता नागार्जुनवर मोठी कारवाई केली आहे. हायड्राने नागार्जुनचे कन्व्हेन्शन सेंटर बुलडोझर फिरवून जमीनदोस्त केले आहे. हायड्रा आणि पोलिसांच्या या संयुक्त कारवाईत कन्व्हेन्शन हॉल जमीनदोस्त करण्यात आला. रंगारेड्डी जिल्ह्यातील शिल्परामम जवळ हा हॉल बांधण्यात आला होता.

केरळ उच्च न्यायालयाची वायनाड भूस्खलनग्रस्तांच्या शोकांतिकेवर टिप्पणी

भरपाईतून हप्ते कापणे असंवेदनशील

तिरुवअनंतपुरम : केरळ उच्च न्यायालयाने वायनाड भूस्खलनग्रस्तांना मिळालेल्या भरपाईच्या रकमेतून बँकांनी 'ईएमआय' कापल्याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. भूस्खलनाच्या घटनेवरून उच्च न्यायालयाने सरकारलाही फटकारले. वायनाड भूस्खलन हे मानवी उदासीनता आणि लोभ यांच्यावरील निसर्गाच्या प्रतिक्रियेचे आणखी एक उदाहरण असल्याचे न्यायमूर्ती ए. के. जयशंकरन नांबियार आणि श्याम कुमार व्ही. एम. यांच्या खंडपीठाने सांगितले.

केरळमधील वायनाड येथे २९ जुलैच्या रात्री भूस्खलन झाले. यामध्ये ४०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. १३८ हून अधिक लोक अजूनही बेपत्ता आहेत. केरळ सरकारने तत्काळ मदत म्हणून भूस्खलनग्रस्तांच्या बँक खात्यात प्रत्येकी १०,००० ऊपये जमा केले होते. मात्र, लोकांचा आरोप आहे की केरळ ग्रामीण बँक त्यांच्या खात्यातून कर्जाचा ईएमआय कापत आहे. काही दिवसांपूर्वी कालपेट्टा येथील बँकेसमोर लोक आणि राजकीय पक्षांनी निदर्शनेही केली होती. त्यानंतर बँकेच्या अधिकाऱ्यांनी यापुढे कर्जाचे ईएमआय कापणार नाहीत असे कर्जदारांना कळवले. मात्र, आता बँकांच्या या कृतीवर न्यायालयाने स्पष्ट शब्दात नाराजी व्यक्त करताना 'असंवेदनशील' असे संबोधले आहे.

उच्च न्यायालयाची सरकारला तंबी

भूस्खलनग्रस्तांच्या मदतीच्या उपाययोजनांवर लक्ष ठेवण्यासाठी उच्च न्यायालयाने स्वतः या घटनेची दखल घेतली. या प्रकरणावर २३ ऑगस्ट रोजी सुनावणी झाली. हा प्रकार किती लोकांसोबत झाला आहे, अशी विचारणा न्यायालयाने राज्य सरकारला केली. हा प्रकार असाच पुढे सुरू राहिला तर आम्ही या प्रकरणात हस्तक्षेप करू, अशी तंबी न्यायालयाने सरकारला दिली आहे. याचदरम्यान, केरळचे मुख्यमंत्री पी विजयन यांनीही राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या (एसएलबीसी) बैठकीत ईएमआय कपातीबद्दल नाराजी व्यक्त केली.

सुटकेसमध्ये सापडला ३ वर्षांच्या चिमुरडीचा मृतदेह

वृत्तसंस्था

मुझफ्फरपूर : बिहारच्या मुझफ्फरपूरमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. सुटकेसमध्ये ३ वर्षीय मुलीचा मृतदेह आढळल्याने येथे खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुलगी तिच्या आईसोबत तिच्या मावशीच्या वाढदिवसाच्या पार्टीला गेली होती. निराला निकेतन येथे एका ३ वर्षाच्या मुलीचा मृतदेह सुटकेसमध्ये आढळून आला. मुलगी आईसोबत तिच्या मावशीच्या वाढदिवसाच्या पार्टीला गेली होती. मिस्टी असे या मुलीचे नाव आहे.

मुलीची आई काजल अद्याप बेपत्ता आहे. मुलीची हत्या केल्यानंतर मृतदेह सुटकेसमध्ये फेकून दिल्याचा संशय आहे. या घटनेची माहिती स्थानिक लोकांनी पोलिसांना दिली. मृतदेहाची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून घटनास्थळाचा पंचनामा केला. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पोस्टमार्टमसाठी एसकेएमसीएचमध्ये पाठवला आहे. मृतदेह आढळल्याने परिसरात घबराटीचे वातावरण आहे. काजल शुक्रवारी तिच्या बहिणीच्या घरी वाढदिवसाच्या पार्टीसाठी मुलगी मिस्टीसोबत घरातून निघाली होती. शनिवारी स्थानिक लोकांना झाडीत लाल रंगाची सुटकेस दिसली. जवळ जात पाहिले असता मुलीचा मृतदेह दिसला.

बलुचिस्तानात बॉम्बस्फोट; दोन मुलांसह तिघांचा मृत्यू

बलुचिस्तान: पाकिस्तान मधील बलुचिस्तानच्या पिशीन जिल्ह्यात एका बाजारपेठेत बॉम्बस्फोट झाला. यात दोन मुलांसह तिघांचा मृत्यू झाला आहे. पाकिस्तानमधील बलुचिस्तानच्या पिशीन जिल्ह्यात बाजारपेठेत शनिवारी (दि. २४) स्फोट झाला. यात दोन मुले आणि एक महिला ठार झाली. तर दोन पोलिसांसह १३ लोक जखमी झाले आहेत. असे वृत्त डॉन या वृत्तसंस्थेने रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांच्या हवाल्याने दिले आहे.

जखमींपैकी १३ जणांना रुग्णालयात उपचारांसाठी पाठवण्यात आले, पाच जखमींची प्रकृती गंभीर असून दोघांना किरकोळ दुखापत झाली आहे.

'टर्मिनेटर' चित्रपटाप्रमाणे डोळ्यात बसवला कॅमेरा!

शूट होतो ३० मिनिटांचा व्हिडीओ

वॉशिंग्टन : सध्याचे युग हे तंत्रज्ञानासाठी प्रसीद्ध आहे. या तंत्रज्ञानाच्या मदतीने काही लोक आपल्या शरीरात काही बदल घडवून आणत असतात. आता रेड लाईट एरियावर लक्ष ठेवण्यासाठी एका व्यक्तीने चक्क डोळ्यात कॅमेरा बसवला आहे. त्यान 'टर्मिनेटर' या हॉलीवूडपटासारखा थ्रील केला आहे.

डोळा हा आपल्या शरीरातील अत्यंत महत्त्वाचा अवयव आहे. डोळ्यांमुळेच आपण हे जग पाहू शकतो. डोळे हे शरीरात कॅमेऱ्याप्रमाणे काम करतात. डोळे मज्जासंस्थेशी जोडलेले असतात व यामुळेच आपण समोरचे दृश्य सहज पाहू शकतो. मात्र, एका व्यक्तीने जगावेगळा प्रयोग केला आहे. या व्यक्तीने आपला खरा डोळा काढून तिथे कॅमेरा बसवला आहे. जगावेगळा प्रयोग करणारी ही व्यक्ती म्हणजे चित्रपट निर्माते रॉब स्पेन्स. त्यांच्या या अनो या प्रयोगामुळ ते रिअल टर्मिनेटर तसेच आयबॉर्ग म्हणून ओळखले जात आहेत. 'टर्मिनेटर' हा हॉलीवूडचा लोकप्रिय थ्रिलिंग चित्रपट आहे. रॉब स्पेन्स यांनी २००७ मध्ये खरा डोळा काढला व त्या जागी बनावट डोळ्याच्या आत त्यांनी एक कॅमेरा बसवला

नव्या पेन्शन योजनेवरून खरगेंची मोदींवर टीका

युनिफाइडचा यू हा मोदी सरकारचा यूटर्न

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी मोदी सरकारने मोठा निर्णय घेतला असून सरकारने यूनिफाइड पेन्शन स्कीम ही नवी योजना सुरू केली आहे. या योजनेला शनिवारी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. सरकारने ही योजना जाहीर केल्यानंतर आता विविध राजकीय प्रतिक्रियाही उमटू लागल्या आहेत. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी या योजनेवरून मोदी सरकारवर खोचक टीका केली आहे.

मल्लिकार्जुन खरगे यांनी एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. मोदी सरकारने नव्या पेन्शन योजनेचे नाव यूनिफाइड पेन्शन स्कीम (UPS) असे ठेवले आहे. यातील यूनिफाइडचा यू हा मोदी सरकारचा यूटर्न आहे. ४ जूननंतर जनतेची शक्ती पंतप्रधान मोदींच्या अहंकारावर हावी होत आहे, अशी खोचक टीका त्यांनी केली. ४ जूननंतर मोदी सरकारने आतापर्यंत चार निर्णय मागे घेतले आहेत. सरकारने काही दिवसांपूर्वीच जाहीर केलेला दीर्घकालीन भांडवली नफा /इंडेक्सेशनच्या संदर्भातील निर्णय मागे घेतला आहे. तसेच वक्फ विधेयक जेपीसीकडे पाठवले आहे याशिवाय ब्रॉडकास्ट विधेयक आणि लॅटरल एंट्री योजनेतही सरकारने माघार घेतली आहे, असेही मल्लिकार्जुन खरगे म्हणाले. तसेच आम्ही सरकारचे उत्तरदायित्व सुनिश्चित करत राहू आणि या देशातील १४० कोटी भारतीयांचे संरक्षण करत राहू, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली.

सराईत गुन्हेगार सतीश गावसला मुंबई विमानतळावरून अटक

वृत्तसंस्था

डिचोली : राज्यात विविध पोलीस स्थानकात तब्बल ९ गुन्हे असलेल्या सराईत गुन्हेगार सतीश गावस याला दुबईहून येताना मुंबई विमानतळावर ताब्यात घेण्यात आले. तो गेल्या दोन वर्षांपासून फरार होता. गोवा पोलिसांच्या पथकाने मुंबई येथे जात त्यास रीतसर अटक केली व आज पहाटे ४ वाजता डिचोली पोलीस स्थानकात आणले गेले. दरम्यान त्याला डिचोली येथील प्रथम वर्ग न्यायालयात सादर करण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार, सतीश गावस हा सराईत गुन्हेगार असून त्यावर गोव्यातील विविध पोलीस स्थानकांत ९ गुन्हे तसेच विविध न्यायालयांत चेक बाऊन्स केल्याप्रकरणी निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्ट, १८८१ च्या कलम १३८ अन्वये अनेक अदखलपात्र गुन्हेही नोंद आहेत.

केंद्रीय मंत्र्यासह 12 हजारांहून अधिक कार्यकर्त्यांवर गुन्हा

पोलिस कर्मचाऱ्यांशी वाद प्रकरण

वृत्तसंस्था

रांची : झारखंडची राजधानी रांची याठिकाणी भारतीय जनता युवा मोर्चाच्या रॅलीदरम्यान पोलिस कर्मचाऱ्यांशी वाद घातल्यामुळे ५१ प्रसिद्ध आणि १२,००० अज्ञात लोकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या अहवालात झारखंड भाजपचे अध्यक्ष बाबुलाल मरांडी, विधानसभेतील विरोधी पक्षनेते अमर कुमार बौरी, केंद्रीय मंत्री संजय सेठ आणि माजी केंद्रीय मंत्री अर्जुन मुंडा यांच्यासह भाजपच्या काही प्रमुख नेत्यांच्या नावांचा समावेश आहे.

रांचीचे वरिष्ठ पोलिस अधीक्षक (एसएसपी) चंदन कुमार सिन्हा यांनी एका वृत्त संस्थेला याविषयी माहिती दिली. यावेळी त्यांनी सांगितले की, दंडाधिकाऱ्यांच्या वक्तव्यावर आधारित रांचीच्या लालपूर पोलिस ठाण्यात एफआयआर नोंदवण्यात आला आहे. या लोकांवर लवकरच कारवाई केली जाईल. लालपूर पोलिस स्टेशनचे प्रभारी रुपेश कुमार सिंह यांनी सांगितले की, ५१ ओळखीच्या लोकांसह १२,००० लोकांविरुद्ध एफआयआर नोंदवण्यात आला आहे. भारतीय जनता युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांवर पोलिसांच्या कारवाईबाबत शनिवारी भाजप कार्यकर्त्यांनी सर्व जिल्हा मुख्यालये आणि पोलिस ठाण्यांवर निदर्शने केली. बॅरिकेड तोडणाऱ्या पोलिस आणि भाजप युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांमध्ये झटापट झाली.

मुसळधार पावसाचा राजस्थानमध्ये कहर

बेवार : राजस्थानमध्ये मुसळधार पावसाने कहर केला आहे. दक्षिण-पश्चिम मान्सूनच्या सक्रियतेमुळे गेल्या २४ तासांत राजस्थानमधील टोंक, पाली, बुंदी आणि भिलवाडा जिह्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस झाला. पावसाशी संबंधित घटनांमध्ये पाच जणांचा मृत्यू झाल्याची माहिती प्रशासकीय पातळीवरून देण्यात आली.

मोदी - योगींचे गुणगाण महिलेला पडले महागात

पतिने महिलेला दिला घटस्फोट

वृत्तसंस्था

अयोध्या: अयोध्येतून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. मुस्लिम महिलेला पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ याचे कौतुक करणे महागात पडले आहे. महिलेच्या पतीने तिच्यावर गरम डाळ फेकत तिला घटस्फोट दिला आहे. या प्रकरणी स्थानिक पोलिसांनी महिलेच्या पतीसह घरातील इतर सदस्यांना अटक केली आहे.

या महिलेचे नाव मरियम आहे. तिने सांगितले की, माझे माहेर बहराइच गावात आहे. तर सासर फैजाबादमध्ये झाले. मी माझ्या कुटूंबासोबत पहिल्यांदाच अयोध्या फिरायला गेले होते. मी पहिल्यादांच शहर बघितले. यावेळी मला शहरातील विकास पाहून छान वाटले.

टर्नेट द्वीप : इंडोनेशियाच्या पूर्वेकडील टर्नेट बेटावर मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरात रविवारी ११ जणांचा मृत्यू झाला. स्थानिक रहिवाशांसह कार्यरत शोध आणि बचाव पथकांनी उत्तर मालुकू प्रांतातील रुआ गावात १० मृतदेह बाहेर काढले आहेत. बेटाच्या शोध आणि बचाव एजन्सीचे अधिकारी ब्रॅम माद्या तेमारा यांच्या म्हणण्यानुसार, टीम आणखी एक मृतदेह बाहेर काढण्यासाठी झटत होती. अचानक आलेल्या पुरामुळे निवासी क्षेत्रे वाहून गेली आणि डझनभर इमारती आणि घरे ढिगाऱ्याखाली गेली.

ठाणे जिल्ह्यातील ४१ ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त

वृत्तसंस्था

ठाणे : क्षयरोगमुक्त ग्रामपंचायत उपक्रमात ठाणे जिल्हयातील ४१ ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त झाल्या असून त्यांना नियोजन भवन येथे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. ठाणे जिल्हयात एकूण ४३१ ग्रामपंचायती आहेत. यातील शहापूर तालुक्यातील-१३ ग्रामपंचायती, मुरबाड तालुक्यातील -९ ग्रामपंचायती, कल्याण तालुक्यातील -७ ग्रामपंचायती, भिवंडी तालुक्यातील-६ ग्रामंपचायती, अंबरनाथ तालुक्यातील -६ ग्रामपंचायतींना जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी शिनगारे म्हणाले की, ३१ मार्च २०२५ पर्यंत ठाणे जिल्हा क्षयरोगमुक्त झाला पाहिजे असे आपणास उद्दिष्ट देण्यात आले आहे. आपली सुरुवात चांगली झाली आहे. त्यामुळे आपले कौतुक करावेसे वाटते. क्षयरोगाचा कलंक आपण काढून टाकण्यामध्ये आपण यशस्वी झाला आहोत.

जिल्हाधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांचे केले कौतुक

क्षयरोग आपल्या गावात पुन्हा येवू नये, यासाठी दक्ष राहायला हवे. आपल्याला दिलेले उद्दिष्टे पूर्ण करायचे आहे. पहिल्या वर्षी आपल्या महात्मा गांधी यांचा कास्य रंगाचा पुतळा सलग दोन वर्षे असल्यास चंदेरी रंगाचा व सलग तीन वर्षे असल्यास सोनेरी रंगाचा पुतळा देण्यात येणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी ग्रामसेवक, सरपंच, आशा कर्मचारी यांच्या कामाचे कौतुक केले. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे यांनी गाव क्षयमुक्त होणे गरजेचे आहे.

ग्रामपंचायतींचा गौरव सोहळा

सीएसआर उपक्रमांतर्गत गोव्यात २१७ कोटींची गुंतवणूक

पणजी : गोव्यातील खासगी कंपन्यांनी (सीएसआर) आतापर्यंत २१७ कोटींची गुंतवणूक केली आहे. यातील सर्वाधिक पैसा आरोग्य आणि शिक्षण सुविधांवर खर्च झाला आहे. सीएसआर उपक्रमांसाठी राज्य सरकारने २० खासगी कंपन्या आणि संस्थांसोबत करार केले आहेत, असे गोवा सीएसआर प्राधिकरणाने सांगितले.

बातमी प्रसिद्ध होताच यश कन्ट्रक्शनला जाग!

इफेक्ट : पुण्यभूमीची एकच बातमी काम सुरु

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

दैनिक पुण्यभूमी बातमीचा दणका, कानडी रोड रस्त्याची दुरावस्थेची बातमी प्रकाशित होताच यश कंट्रक्शन व सार्वजनिक बांधकाम उपविभाग सुतासारखे सरळ होऊन रस्त्याचे काम केले चालू,रस्त्याचे काम चालू झाल्यामुळे स्थानिक नागरिकांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.दैनिक पुण्यभूमी ने केलेली बातमी यश कन्ट्रक्शनच्याआडमुठ्या धोरणामुळे व बांधकाम विभागाच्या निष्काळजी पणामुळे स्थानिक नागरिकांसह वाहन चालक त्रस्त झाले आहेत.यश कंट्रक्शनला नेमके अभय कोणाचे ? असा सवाल स्थानिक नागरिकासह प्रवाशांमधून उपस्थित केला जात होता. या आशी बातमी दैनिक पुण्यभूमी वृत्तपत्रांत प्रसिद्ध होताच यश कंट्रक्शन व सार्वजनिक बांधकाम उपविभाग केज हे सुतासारखे सरळ होऊन सदर बातमीची व स्थानिक नागरिकांच्या तक्रारीची दखल घेऊन तात्काळ रस्त्याचे काम चालू केले आहे.त्यामुळे स्थानिक नागरिकांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.तसेच स्थानिक नागरिकांनी दैनिक पुण्यभूमी वृत्तपत्र संपादकाचे आभार मानले आहेत.तसेच क्रांतीनगर येथील स्थानिक नागरिकांनी निवेदनाद्वारे प्रशासनास मंगळवार रोजी आंदोलन करण्याचा क्रांती नगर येथील नागरिकांनी प्रशासनास इशारा दिला होता. परंतु सदर योजनेची व बातमीची प्रशासनाने देखील दखल घेऊन संबंधित गुत्तेदारास काम करण्याचे आदेश दिले व तशा सूचना देखील दिल्या आहेत.केज शहरातून

Page 6
26 Aug 2024

पुण्यभूमी

यश कंन्ट्रक्शनच्या कामात काळाबाजार !

बोंबला | भोगस कामे करणाऱ्या यश कंट्क्शनला अभय ?

कानडी माळी सह ग्रामीण भागात जाणाऱ्या रस्त्याचे काम हे सहा महिन्या पासून यश कंट्रक्शन करत आहे. केज-कानडी माळी हा रस्ता कोकीसपिर,क्रांतीनगर ते क्रांतीनगर येथील सार्वजनिक स्मशानभूमी पर्यंत गेल्या सहा महिन्यापासून काम चालू आहे.तसेच नाले बांधकाम काही ठिकाणी पूर्ण झाल्यामुळे एक महिन्यापासून सर्व जुना डांबरी रस्ता खोदून ठेवल्यामुळे व सदर रस्त्याच्या खोदकामामुळे अनेक ठिकाणी केज नगरपंचायत व धनेगाव ची पाईपलाईन फुटल्या मुळे गेले तीन महिन्या पासून येथील रहिवासी नागरिकांना पिण्याचे पाणी नाही. सध्या पावसाळा चालू आहे दररोज च्या पावसामुळे सर्व रस्त्यावर चिखल,गाळ झाल्यामुळे दररोज ५० ते ६० मोटरसायकल स्लीप होऊन नागरिक पडत आहेत यामध्ये महिला,मुली-मुले वयोवृद्ध नागरिक यांचे प्रमाण अधिक आहे.काही ठिकाणी जुने लाईटचे पोल काढून नवे पोल बसविले आहेत तर काही ठिकाणी जुने तसेच आहेत.

येत्या तीन दिवसात सदर रस्त्याचे बंद असलेले काम तात्काळ सुरू करण्यात यावे अशीलेखी निर्णयाद्वारे केज तहसीलदार यांच्याकडे मागणी केली होती. अन्यथा मंगळवार दिनांक २७ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १०-०० वाजता हनुमान मंदिरा समोर क्रांतीनगर येथील कानडी रोड येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा येथील नागरिकांनी तहसीलदार केज यांना लेखी निवेदनाद्वारे इशारा दिला होता.आमच्या दैनिक पुण्यभूमी प्रतिनिधीशी बोलताना येथील स्थानिक नागरिक म्हणाले की,गेले अनेक दिवसापासून सदर रस्त्याच्या कामाच्या अनुषंगाने यश कंट्रक्शन चे इंजिनिअर व कर्मचारी आणि सार्वजनिक बांधकाम उपविभाग, केज यांना वेळोवेळी तक्रार करून व भेटून देखील आमच्या कामाची कसल्याच प्रकारची दखल घेतली नव्हती या उलट आम्हाला उडवा उडवीची उत्तरे देत होते. तसेचकाही ठिकाणी नालीचे काम झाले आहे परंतु बऱ्याचशा ठिकाणी नालीला पूर्णपणे तडे गेले आहेत त्यामुळे सदर काम निकृष्ट दर्जाचे होत असताना देखील लोकप्रतिनिधी व बांधकाम विभाग डोळेझाक पणा करत आहे असाही नागरिकांनी आरोप केला आहे.पुढे बोलताना ते म्हणाले की,सदर रस्त्याचे नालीचे काम अनेक ठिकाणी केले असून काही ठिकाणी गल्लीतील येणाऱ्या रस्त्यापर्यंत नालीचे काम केले आहे. गल्लीतील येणाऱ्या रस्त्याला नालीचे काम जोडलेले नसल्यामुळे पावसाचे पाणी व सदर नालीचे पाणी रस्त्यावरून येत असल्यामुळे या भागातील रहिवासी नागरिकांना व या रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्याग्रामीण भागातील वाहनचालकांना तारावरची कसरत करावी लागत आहे.

मंगळवार दिनांक २७ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १०-०० वाजता हनुमान मंदिरा समोर क्रांतीनगर येथील कानडी रोड येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा येथील नागरिकांनी तहसीलदार केज यांना लेखी निवेदनाद्वारे इशारा दिला होता.आमच्या दैनिक पुण्यभूमी प्रतिनिधीशी बोलताना येथील स्थानिक नागरिक म्हणाले की,गेले अनेक दिवसापासून सदर रस्त्याच्या कामाच्या अनुषंगाने यश कंट्रक्शन चे इंजिनिअर व कर्मचारी आणि सार्वजनिक बांधकाम उपविभागीय केज यांना वेळोवेळी तक्रार करून व भेटून देखील आमच्या कामाची कसल्याच प्रकारची दखल घेतली नव्हती या उलट आम्हाला उडवा उडवीची उत्तरे देत होते. तसेचकाही ठिकाणी नालीचे काम झाले आहे परंतु बऱ्याचशा ठिकाणी नालीला पूर्णपणे तडे गेले आहेत त्यामुळे सदर काम निकृष्ट दर्जाचे होत असताना देखील लोकप्रतिनिधी व बांधकाम विभाग डोळेझाक पणा करत आहे असाही नागरिकांना आरोप केला आहे.पुढे बोलताना ते म्हणाले की,सदर रस्त्याचे नालीचे काम अनेक ठिकाणी केले असून काही ठिकाणी गल्लीतील येणाऱ्या रस्त्यापर्यंत नालीचे काम केले आहे. गल्लीतील येणाऱ्या रस्त्याला नालीचे काम जोडलेले नसल्यामुळे पावसाचे पाणी व सदर नालीचे पाणी रस्त्यावरून येत असल्यामुळे या भागातील रहिवासी नागरिकांना व या रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्याग्रामीण भागातील वाहनचालकांना तारावरची कसरत करावी लागत आहे. यशकंट्रक्शन व सार्वजनिक बांधकाम विभागाशी अनेक वेळा नागरिकांनी तक्रार करून त्यांना भेटून संपर्क साधला तरी देखील ते जाणीवपूर्वक टाळाटाळ करत होते. तसेच यश कंट्रक्शनच्या आडमुढ्या धोरणामुळे व बांधकाम विभागाच्या निष्काळजी पणामुळे नाहक त्रास होत आहे सदरचे काम हे आमदार फंडातून आलेले आहे या कामाकडे आमदार नमिता मुंदडा यांचेही देखील लक्ष नाही. लोक प्रतिनिधी हे स्वतःची टक्केवारी घेऊन गप्प बसत आहेत असा आरोप सामाजिक कार्यकर्ते बाबुराव गालफाडे यांनी केला होता.

पुढे बोलताना गालफाडे म्हणाले की,सदर रस्त्याचे काम करत असताना पाण्याची पाईप लाईन फुटली अथवा ना दुरुस्त झाली तर ती दुरुस्त करण्याची जबाबदारी ही यश कंट्रक्शनची असताना ते टाळाटाळ करत आहेत. त्या अनुषंगाने आम्ही बांधकाम विभागाशी संपर्क केला ते तोंडीच म्हणतात आम्ही सदर कंट्रक्शनला पाईपलाईनचे काम करायला सांगतो परंतु अद्यापही पाईप लाईनचे काम पूर्ण झाले नाही.या यश कंट्रक्शनला नेमका अभय कोणाचा आहे? व त्यांना कोण पाठीशी घालत आहे असा ही बाबुराव गालफाडे यांनी सवाल उपस्थित केला होता.अशी बातमी दैनिक पुण्यभूमी वृत्तपत्र मध्ये प्रकाशित होताच सदर बातमीची व स्थानिक नागरिकांच्या तक्रारीची दखल घेऊन प्रशासनाने संबंधित तात्काळ सदर रस्त्याचे काम करण्याचे आदेश देऊन तसेच सूचना देखील दिल्या आहेत.

मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षण योजनेचा फज्जा

आप: मर्जीतल्या उमेदवारांची भरती!

नेवासा/पुण्यभूमी प्रतिनिधी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत तालुक्यात शिक्षण, ग्रामपंचायत आदी विभागात मर्जीतील उमेदवारांची भरती करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून त्यास आम आदमी पार्टीसह वंचित बहुजन आघाडीने जोरदार हरकत घेऊन ही प्रक्रिया नव्याने राबविण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात तालुक्यातील इच्छुक वंचित लाभार्थ्यांसह गुरुवारपासून नेवासा पंचायत समिती समोर उपोषणस बसण्याचा इशारा 'आप'चे तालुकाध्यक्ष ऍड. सादिक शिलेदार यांनी दिला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्या मार्फत संयुक्तपणे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबविली जात आहे. यानुषंगाने अहमदनगर जिल्हा परिषदेअंतर्गत प्राथमिक शिक्षण विभाग, ग्रामपंचायत आदी अधिनस्त आस्थापनांवर मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत शिकाऊ प्रशिक्षणार्थी नेमण्याची प्रक्रिया अत्यंत संदिग्धपणे राबविण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील तालुक्यात तब्बल १५० प्रशिक्षणार्थी भरती करण्यात आली आहे. तर शिक्षण विभागातील प्रशिक्षणार्थ्यांची भरती २३ ते २५ ऑगस्ट या कालावधीत करण्यात आली. यासाठी १२वी पास, आयटीआय, पदविका, पदवी, पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासनाच्या हीींीि://ीक्षसरी.ारहीुरूरा.र्सीं.ळप या संकेत स्थळावर ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करण्यास प्रेरित करण्याचे यासंदर्भातील परिपत्रकात नमूद करण्यात आले होते. उमेदवारांना ज्या शाळेतील मंजूर पदसंख्या चार किंवा चारपेक्षा अधिक आहे अशा पुरेसे संगणकीय प्रणाली, साहित्य उपलब्ध आहे अशाच शाळांच्या आस्थापनेवर त्यांना शिकाऊ प्रशिक्षणार्थी म्हणून नेमणूक देण्याचे नियोजन होते. यासाठी सहा महिन्यांचा कालावधी गृहीत धरून १२वी पास प्रशिक्षणार्थ्यांना ६००० रुपये, पदवी, पदविका धारक प्रशिक्षणार्थ्यांना ८००० रुपये तर पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना १०००० रुपये मानधन देण्यात येणार आहे.

मात्र या योजनेची कुठलीही जाहिरात न करता प्रशासकीय पातळीवरच हे परिपत्रक फिरून सर्व संबंधितांच्या मर्जीतील प्रशिक्षणार्थ्यांना नियुक्त्या देण्यात आल्या. पान २ वर...

बेरोजगारांची क्रूर थट्टा, उपोषण करणार

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अंतर्गत शिक्षण, ग्रामपंचायत आदी शासकीय स्तरांवर करण्यात आलेली प्रशिक्षणार्थ्यांची भरती प्रक्रिया सदोष आहे. बेरोजगारीची समस्या कमी करण्याच्या उदात्त हेतूला प्रशासनानेच काळिमा फासला आहे. सदरची योजना मनमानीपणाने राबवून प्रशासनाने तालुक्यातील बेरोजगारांची क्रूर थट्टा केली असल्याचा आरोप आम आदमी पार्टीचे ऍड. सादिक शिलेदार, प्रवीण तिरोडकर यांनी करून गुरुवार पासून उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे.

काळ्या फिती लावून निषेध मोर्चा

आक्रमक: बहिणींच्या सुरक्षेसाठी विद्यार्थ्यींनी रस्त्यावर

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

नुकत्याच झालेल्या बदलापूर आणि कोलकाता येथील अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ कडा येथील विविध शाळा महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी निषेध मोर्चा काढून नराधमांना फाशी देण्याची मागणी करण्यात आली.

राज्यातील बदलापूर येथे चिमूरड्या मुलींवर झालेल्या झालेला अत्याचार आणि कोलकत्ता येथे डॉक्टर युवतीवर बलात्कार करून तिची करण्यात आलेली हत्या या घटनेच्या निषेधार्थ कडा येथे विविध शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी आपापल्या शाळेपासून गावातील भाजी मंडईपर्यंत निषेध मोर्चा काढला. या मोर्चाचे रूपांतर छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोर सभेत झाले. यावेळी मोर्चात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनीनी मनोगत व्यक्त केले आणि अशा प्रकारच्या गुन्ह्यातील आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची जोरदार मागणी केली. त्याचप्रमाणे असा प्रकार कुठेही

होऊ नये. यासाठी सामाजिक संरक्षणाची मागणी केली. अमोलक जैन शिक्षण संस्थेचे मोतीलाल कोठारी विद्यालय , पी एम मुनोत कनिष्ठ महाविद्यालय, श्रीराम कनिष्ठ विद्यालय, भगिनी निवेदिता कन्या प्रशाला, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, बी फार्मसी कॉलेज, गांधी नर्सिंग स्कूल, रसिकलाल धारिवाल डी फार्मसी कॉलेज , लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूल इत्यादी शाळा महाविद्यालयातील हजारो विद्यार्थिनीनी या निषेध मोर्चामध्ये काळ्या फिती लावून सहभागी झाल्या होत्या. याप्रसंगी महिला, मुलींवरील अत्याचार रोखण्यासाठी प्रशासनाला निवेदन देण्यात आले. कड्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय नरवाडे म्हणाले की, शाळा, महाविद्यालयीन मुलींना काहीही अडचण आल्यास १०० आणि ११२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले. तसेच कड्यात रस्त्यावरील धुमस्टाईल टगेगिरीचा देखील पोलिस लवकरच बंदोबस्त करुन थेट गुन्हे दाखल करणार असल्याचे सांगीतले.

गणेशोत्सव शांतता व उत्साहात पार पडावा!

जिल्हाधिकारी:बीड जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शांततापूर्वक आणि संयमी पणाने आपण येणाऱ्या काळातील गणेशोत्सव साजरा करावा असे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आज येथे केले. जिल्हयातील गणेशोत्सवासह येणाऱ्या काळातील सणांच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक आज नियोजन समितीच्या सभागृहात झाली. यावेळी ते बोलत होते.जिल्ह्यातील शांतता समितीच्या या बैठकीला पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ, अपर पोलिस अधिक्षक सचिन पांडकर, पोलिस उपविभाग माजलगाव डी. बी. धिरजकुमार तसेच निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्ह्यातील नगरपालिकांचे मुख्य अधिकारी तसेच प्रशासकही यावेळी बैठकीत उपस्थित होते.

शहरात उत्सव चांगल्या पद्धतीने पार पान २ वर...

परळीत मनोज जरांगेंची घोंगडी बैठक

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठायोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या मतदार संघनिहाय घोंगडी बैठका होत आहेत. रविवार दि.८ सप्टेंबर २०२४ रोजी परळी येथे घोंगडी बैठक होणार आहे. त्यासाठी पूर्वतयारी ची बैठक श्रद्धा मंगल कार्यालय, परळी वैजनाथ येथे पार पडली. या बैठकीमध्ये घोंगडी बैठकीच्या तयारीसाठी ज्या प्रकारे नियोजन करावे लागणार आहे त्याबद्दल समाज बांधवांनी विस्तारित चर्चा व मंथन केले. दरम्यान परळी मतदारसंघातील समाजातील लहान थोर, वडीलधारी मंडळी,महिला यांनी सहभागी व्हावे तसेच या विषयी प्रचार प्रसार करण्यासाठी वेगवेगळ्या समित्या तयार करण्यात आल्या असून ही घोंगडी बैठक समाजाला दिशा देणारी असेल असा विश्वास या प्रसंगी समाज बांधवांनी व्यक्त केला. पूर्वनीयोजन बैठकीचे आयोजन श्रद्धा मंगल कार्यालय पावर हाऊस समोर करण्यात आले होते. परळी मतदार संघातील मराठा समाजातील बांधव मोठ्या संख्येने या बैठकीला उत्स्फूर्तपने उपस्थित होते.

रिक्षावाला पण निघाला इमानदार

प्रामाणिक: २५ हजाराचा मोबाईल व किंमती सामान परत

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग क्षेत्र असलेल्या परळी वैजनाथ येथे सध्या श्रावण महिन्याचा पर्वकाळ सुरू असुन या निमित्ताने राज्य व परराज्यातून असंख्य भाविक परळी दाखल होत असतात. अतिशय गर्दी व मंदिर परिसरात असलेल्या घाईगडबडीत अनेकांचे किंमती सामान, दागिने, पाकीट वगैरे गहाळ होते. मात्र परळी येथील स्थानिक नागरिक याबाबत नेहमीच सकारात्मक व ईमानदार असल्याची अनेक उदाहरणे यापूर्वी बघायला मिळाली आहेत. अशाच प्रकारचे एक उदाहरण परळीच्या एका ईमानदार

रिक्षावाल्यानेही आज दाखवून दिले आहे.

तेलंगाना राज्यातील बिदर येथील भाविक सहकुटुंब प्रभू वैद्यनाथचे दर्शन घेण्यासाठी परळी वैजनाथ येथे आले होते. त्यांचे किमती सामान व मोबाईल किंमत २५००० असे रोडवर पडले. ते भाविक तसेच निघून गेले प्रभू वैजनाथ दर्शनानंतर या भाविकांच्या ही बाब लक्षात आली. मात्र या ठिकाणी उपस्थित असलेल्या परळीतील रिक्षा चालक अमोल गित्ते रा. परळी वैजनाथ यांना रस्त्यावर मोबाईल वही किमती सामान पान २ वर...

डॉ.योगेश क्षीरसागर | उपस्थित राहण्याचे आवाहन

बीडमध्ये जनसन्मान यात्रेची जय्यत तयारी!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात सुरू असलेली जनसन्मान यात्रा बीडमध्ये गुरुवारी (दि.२९) सकाळी ९.३० वाजता येत आहे. या यात्रेनिमित्ताने शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर भव्य सभा होणार आहे. या यात्रेच्या स्वागताचे नियोजन पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली जय्यत तयारी सुरू असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली आहे.

उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांनी माझी लाडकी बहिण या योजनेसह सर्व समाजघटकांसाठी

राबविलेल्या अभिनव योजनांची माहिती देण्यासाठी जनसन्मान यात्रा काढली असून याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या यात्रेनिमित्त ना.अजितदादा पवार यांच्यासमवेत राष्ट्रीय कार्याध्यक्ष खा.प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, राष्ट्रीय प्रवक्ते तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्यासह इतर मंत्री, पक्षाचे सर्व सेलचे प्रदेशाध्यक्ष, नेत्यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. ही यात्रा बीडमध्ये दाखल झाल्यानंतर पोलीस मुख्यालयापासून युवकांची दुचाकी रॅली काढून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन केले जाईल. सभास्थळी ना.अजितदादा पवार हे महिला भगिनींशी संवाद साधतील. कार्यक्रमाच्या अनुषंगाने भव्य असा वॉटरप्रुफ मंडप उभारण्यात पान २ वर...

शासनाकडून मैदानाचा आढावा

बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर ना.अजितदादा पवार यांच्या जनसन्मान यात्रेनिमित्त भव्य सभा होणार आहे. सभास्थळाची पाहणी करून डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यवस्थांचा आढावा घेतला. तसेच, नियोजनासंदर्भात त्यांच्या संपर्क कार्यालयात बैठक पार पडली. यावेळी डॉ. सारिकाताई क्षीरसागर, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वंभर गोल्डे, शिवाजीनगरचे पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, बीड शहरचे पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता इंजि.चंद्रकांत बोराडे यांच्यासह नगरपरिषद, महावितरण कंपनीसह इतर विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

रॅगिंगमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य उध्वस्त होते!

हनुमंत भोसले:महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

केज /पुण्यभूमी प्रतिनिधी

महाविद्यालयीन जीवनात अनेक विद्यार्थी स्वैर वागताना आपल्या खालच्या वर्गातील व आपल्यापेक्षा लहान विद्यार्थ्यांचा विविध प्रकारे मानसिक व शारीरिक छळ करतात. यामुळे अनेक विद्यार्थी मोठ्या विद्यार्थ्यांनी सार्वजनिक ठिकाणी व जाहीरपणे केलेला असा छळ, टिंगल चेष्टा-मस्करी सहन करू शकत नाहीत व परिणामतः आत्महत्या करतात. या बाबी कायद्याने गुन्हा असून यासाठी कायद्यात किमान दोन वर्षांचा कारावास व दहा हजार रुपये दंड अशा शिक्षेचे प्रावधान असून अशा गोष्टीपासून विद्यार्थ्यांनी दूर राहावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते केज न्यायालयाअंतर्गत कार्यरत पॅरालीगल वॉलिनटीअर हनुमंत

भोसले यांनी केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड व जिल्हा सत्र न्यायालयाच्या वतीने आयोजित केज येथील बाबुराव आडसकर महाविद्याल्यात अँटीरॅगिंग मार्गदर्शन शिबिरात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य एम जी फावडे हे होते तर विचारपीठावर ऍड एस व्ही मिसळे, पीएलव्ही संजय , भाग्यश्री काकडे, प्रा किर्दत, प्रा डॉ हिरवे यांची उपस्थिती होती.रॅगिंग सारख्या बाब विद्यार्थ्यांमध्ये गुन्हेगारी वृत्ती निर्माण करते. वरच्या वर्गातील विद्यार्थी अहंमभावातून खालच्या वर्गातील विद्यार्थ्यांचा मानसिक व शारीरिक छळ होईल अशी कृत्ये करतात. ज्यामध्ये सार्वजनिक ठिकाणी जाहीररीत्या त्यांना अपमान वाटेल अशी कृत्ये ज्यामध्ये उद्या मारणे, उठबश्या काढणे, अर्ध नग्न होणे, गाणे म्हणणे किंवा इतर लाज वाटेल असे कृत्य करायला सांगतात, त्यांना उद्धेशून पान २ वर...